# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# विद्यावार्ता

ऑगस्ट २०२६

ई - मासिक





"अज्ञानाचा अंधार दूर
करुन ज्ञानाचा प्रकाश पसरवणे
हीच खरी राष्ट्रसेवा"
– कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठात भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

# विद्यावार्ता
ई - मासिक


# अनुक्रमणिका


- विद्यापीठात ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा — १
- क्यू.एस. आशिया युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये अमरावती विद्यापीठाची उत्तुंग भरारी — ५
- स्वातंत्र्य दिनी विद्यापीठात अमृत – एसआरआयएफ योजनेचा शुभारंभ — ६
- आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार — ८
- एन.सी.सी. महाराष्ट्र संचालनालयाच्या अतिरिक्त महासंचालकांची विद्यापीठाला सदिच्छा भेट — १८
- विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद — १९
- विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागामध्ये सहअभ्यासक्रम सुरू — २१
- नशामुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियानाचा अमरावतीत उत्साहात शुभारंभ — २२
- राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यापीठात विविध क्रीडा स्पर्धा संपन्न — २४
- विद्यापीठातील गृहविज्ञान विभागात स्तनपान जनजागृती सप्ताह उत्साहात साजरा — २५
- विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागात जागतिक हत्ती दिनानिमित्त माहितीपटाचे प्रदर्शन — २६
- ग्रामगीता व्याख्यानमाला संपन्न — २७
- अमरावतीत स्टार्ट–अप एक्स्पो – २०२६ उत्साहात संपन्न — २९
- रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन व मेधा वाटिका एडलॅब्स प्रा.लि. यांच्यात करारनामा — ३१
- विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त कर्मचा–यांचा 'कर्तव्यपूर्ती सोहळा' संपन्न — ३२
- जयंती विशेष — ३५
- बातमी कात्रणे — ३६





**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**

**मार्गदर्शक**

**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र- कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**प्रकाशक**

**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

**संपादक**

**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

https://www.sgbau.ac.in

E-mail-pro@sgbau.ac.in




# अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा प्रकाश पसरवणे हीच खरी राष्ट्रसेवा - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

### विद्यापीठात ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

## कुलगुरूंच्या हस्ते विद्यापीठात ध्वजारोहण



ध्वजारोहण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक विकासामध्ये दिलेले योगदान उल्लेखनीय असून सर्व शिक्षक व विद्यार्थी या योगदानामधील सातत्य कायम ठेवतील. अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा व कौशल्याचा प्रकाश पसरवणे हीच आपली खरी राष्ट्रसेवा असेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठात ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी ध्वजारोहण केले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत व श्री राजेश पिदडी आदी उपस्थित होते.

ध्वजारोहणप्रसंगी उपस्थितांना संबोधित करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, वीर हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले, त्यांच्या त्यागाचे स्मरण करण्याचा आणि त्यांच्या चरणी नम्र कृतज्ञता व्यक्त करण्याचा आजचा हा दिवस आहे.



मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे आणि राष्ट्र उभारणीचे सर्वात मोठे साधन आहे. संत गाडगे बाबा यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आपल्या विद्यापीठाने नेहमीच ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक बांधीलकीचा वारसा पुढे चालवला आहे. विद्यापीठाने प्रतिष्ठित क्युएस रँकिंगमध्ये मानाचे स्थान मिळवले असून एशियन युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये १००१-११०० बँडमध्ये आणि दक्षिण आशियामध्ये ३३० वा क्रमांक पटकावला आहे. हे यश आपल्या सर्वांच्या प्रचंड मेहनतीचे फलित आहे.

विद्यापीठाने ए.आय. सह नवीन अभ्यासक्रम सुरू केले आहेत, त्याचा निश्चितच विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. विद्यापीठ व महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. अनेकांना स्टार्टअप साठी फंड सुद्धा दिला गेला आहे. त्यामुळे अधिकाधिक स्टार्टअप भविष्यात तयार करण्यासाठी चालना मिळणार आहे.

आंतरराष्ट्रीय परिषदेत कु. रुबिना चांद शेख आणि डॉ. अनिता पाटील व कु. अनघा मोरोपंत उंदिरवाडे यांनी मिळिवलेले यश उल्लेखनीय आहे. विद्यापीठाचे विद्यार्थी, खेळाडू, कलावंत, कलाकार, संशोधक यांनी विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये भर घातली आहे. आंतर विद्यापीठ आणि अखिल भारतीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, संशोधन स्पर्धा आणि इतरही स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दर्जेदार व नेत्रदीपक कामगिरी करुन पदके व पारितोषिके मिळवली आहेत. विद्यापीठाच्या प्रशासकीय व शैक्षणिक विकासामध्ये विशेषतः भौतिक विकास यामध्ये सुद्धा विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे फार मोठे योगदान आहे.

विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व विद्यार्थी, कलावंत, खेळाडू, संशोधक यांनी अधिकाधिक प्रयत्न करुन आपल्या कामगिरीमध्ये अधिक वाढ करावी आणि विद्यापीठाचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने पोहोचविण्याकरीता प्रयत्न करावा. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय परिसंवादामध्ये सादर केलेल्या प्रकल्पधारीत संशोधन पत्र, पेटेन्ट, महत्वपूर्ण सामाजिक विषय आणि नाविन्यपूर्ण शोध किंवा योगदान, यासाठी युजी, पीजी आणि पीएच.डी. च्या संशोधक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी कुलगुरू फेलोशीप सुरु करण्यात आली असून त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरूंनी याप्रसंगी केले.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्याग व बलीदान देणाऱ्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करुन कुलगुरूंनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. संचालन पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी केले. स्वातंत्र्य दिन कार्यक्रमाला विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते



# स्वातंत्र्य दिन.... कार्यक्रमाला उपस्थिती














# सांस्कृतिक कार्यक्रमाचे सादरीकरण..












# क्यू.एस. आशिया युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये अमरावती विद्यापीठाची उत्तुंग भरारी

> हे यश विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, संशोधक, विद्यार्थी आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम आणि उद्योग सहकार्यावर अधिक भर देत अमरावती विद्यापीठाला जागतिक स्तरावर ; नवीन उंचीवर नेण्याचा आमचा संकल्प आहे.
>
> – कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

जागतिक स्तरावरील अत्यंत प्रतिष्ठित मानाच्या 'क्यूएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६' मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी करत दमदार झेप घेतली आहे. विद्यापीठाने आशिया खंडात १००१-११०० च्या बँडमध्ये, तर दक्षिण आशियात ३३० वा क्रमांक पटकावून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ इयरबुक'मध्ये विद्यापीठाच्या या यशाची अधिकृत नोंद घेण्यात आली आहे.

**कुशल नेतृत्व आणि नियोजनबद्ध धोरणांचे यश**

विद्यापीठाच्या या ऐतिहासिक यशामागे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे दूरदर्शी नेतृत्व, गुणवत्ताकेंद्रित धोरणे आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यांचा मोलाचा वाटा आहे. कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, नवोपक्रम, विद्यार्थी विकास आणि आंतरराष्ट्रीय निकषांची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी केली. अंतर्गत गुणवत्ता कक्षा चे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी विविध उपक्रमांचा पाठपुरावा केला.

**गुणवत्ता वाढीसाठी राबवलेले महत्त्वपूर्ण उपक्रम**

गेल्या दोन वर्षात अंतर्गत गुणवत्ता कक्षामार्फत विद्यापीठात महत्त्वाचे सकारात्मक बदल घडवून आणण्यात आलेत. प्रत्येक शिक्षकासाठी दरवर्षी किमान तीन दर्जेदार संशोधन निबंध प्रकाशित करण्याचे धोरण आखण्यात आले. स्कोपस, डब्ल्यूओएस आणि यूजीसी च्या निकषांनुसार संशोधनाचे अंतर्गत परीक्षण सुरू करण्यात आले. सर्व विभागांमध्ये व्हॅल्यू ॲडेड (मूल्यवर्धित) कोर्सेसची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली. एपीआय प्रमाणपत्र प्रणाली आणि सीएएस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) प्रक्रियेला गती तसेच परीक्षेचे निकाल जाहीर करण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करण्यात आला. त्याचबरोबर 'स्कुल कनेक्ट' कार्यक्रम, संलग्न महाविद्यालयांच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा चे मार्गदर्शन, माजी विद्यार्थ्यांचा सहभाग आणि उद्योग जगतासोबतच्या सामंजस्य करारांमध्ये वाढ करण्यात आली. संशोधन आणि विद्यार्थी विकासात सकारात्मक बदल या उपक्रमांमुळे विद्यापीठातील उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधील संशोधन प्रकाशनांत मोठी वाढ झाली आहे. याशिवाय पेटंट्सची संख्या, संशोधन फेलोची संख्या, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, उच्च शिक्षणातील प्रवेश, आणि क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीत कमालीची सुधारणा दिसून येत आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची ही कामगिरी जागतिक दर्जाच्या शैक्षणिक वाटचालीची महत्त्वपूर्ण पावती ठरली असून, भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी उच्च स्थान मिळवण्यासाठी संपूर्ण विद्यापीठ परिवाराला यामुळे मोठी प्रेरणा मिळाली आहे.




उद्‌घाटन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते,प्र–कुलगुरू डॉ.महेंद्र ढोरे तसेच श्री विजय जोशी व इतर मान्यवर

# स्वातंत्र्य दिनी विद्यापीठात अमृत - एसआरआयएफ योजनेचा शुभारंभ ..

## विद्यार्थी, नवउद्योजकांना स्टार्टअप, नवकला, उद्योजकतेसाठी मिळणार नवी दिशा

स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन आणि अमृत यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणा–या 'अमृत – एसआरआयएफ' योजनेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या योजनेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व अमृतचे व्यवस्थापकीय संचालक श्री विजय जोशी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. विद्यापीठातील विद्यार्थी, नवउद्योजक आणि स्टार्टअप्सना उद्योग व व्यवसाय क्षेत्रासाठी आवश्यक मार्गदर्शन, इन्क्युबेशन सुविधा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि उद्योजकता विकासासाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. याप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, व्यवस्थापक श्री अमोल हिरुळकर यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे संचालक, अधिकारी व मान्यवर तसेच अमृतचे अमरावती विभागीय व्यवस्थापक श्री प्रवीण कोळेश्वर, जिल्हा व्यवस्थापक श्री ऋषिकेश कथलकर प्रामुख्याने उपस्थित होते.

'अमृत – एसआरआयएफ' योजनेच्या माध्यमातून पात्र विद्यार्थी व नवउद्योजकांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यावसायिक स्वरुप देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध होणार आहे.

नवकल्पना विकसित करणे, स्टार्टअप उभारणी, व्यवसाय मॉडेल तयार करणे, बाजारपेठेची समज विकसित करणे, तज्ज्ञ मार्गदर्शन व मेंटॉरिंग तसेच इन्क्युबेशनच्या माध्यमातून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर या योजनेत भर राहणार आहे. एसजीबीएयू रिसर्च ॲन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन (एसआरआयएफ) हे विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधक आणि नवउद्योजकांच्या अभिनव कल्पनांना स्टार्टअप व उद्योगांमध्ये रुपांतरित करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.




चर्चा करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते
तसेच श्री विजय जोशी, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व कुलसचिव डॉ. अविनाश असनारे

अमृतच्या सहकार्याने सुरू झालेल्या या योजनेमुळे उद्योजकतेकडे वळू इच्छिणा–या युवकांना विद्यापीठाच्या इन्क्युबेशन इकोसिस्टमचा लाभ मिळणार असून, त्यांच्या कल्पनांना प्रत्यक्ष व्यवसायामध्ये रुपांतरित करण्यासाठी आवश्यक पाठबळ उपलब्ध होणार आहे. या योजनेमुळे ‘नवकल्पनेतून उद्योजकता आणि उद्योजकतेतून रोजगारनिर्मिती’ या संकल्पनेला चालना मिळणार आहे. विद्यापीठ, अमृत आणि एसआरआयएफ यांच्या समन्वयातून सुरु झालेली ही योजना अमरावतीसह विदर्भातील स्टार्टअप व उद्योजकता परिसंस्था अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इन्क्युबेशन सेंटरच्या टीममधील श्री नरेश मोवाळे, श्री रवी ढेंगळे, श्री रणधीर घाटे, श्री आदित्य किल्लेवाले आदींनी विशेष परिश्रम घेतले.





# वैशाली माडे यांच्या जिद्द आणि परिश्रमाची प्रेरणा घेवून यश मिळवा
# कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे विद्यार्थ्यांना आवाहन
# आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार




मार्गदर्शन करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व व्यासपीठावर इतर मान्यवर

यश आपल्या पुढेच असते. मात्र थोड्याशा अपयशाने खचून न जाता आपल्या विद्यापीठाची माजी विद्यार्थीनी, विद्यापीठाला राष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळवून देणारी प्रसिध्द गायिका वैशालीताई माडे यांच्या जिद्द आणि परिश्रमातून प्रेरणा घेऊन विद्यार्थ्यांनी यश मिळवावे. २०२५–२६ हे वर्ष विद्यापीठासाठी सुवर्णमयी वर्ष राहिले आहे आणि विद्यार्थ्यांनी ज्याप्रमाणे आपल्या विद्यापीठाचा राष्ट्रीय स्तरावर नावलौकीक केला, त्याचप्रमाणे याही वर्षी विद्यार्थ्यांनी यश संपादन करावे, असे आवाहन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यार्थ्यांना केले. सत्र २०२५–२६ मध्ये मध्य विभाग, अखिल भारतीय व राष्ट्रीय कव्वाली आंतर विद्यापीठ अशा विविध स्पर्धांमध्ये अभूतपूर्व यश संपादन करुन प्राविण्य प्राप्त करणा–या विद्यार्थीकलावंत, साथिदार, प्रशिक्षक व चमू व्यवस्थापक यांचा कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या हस्ते रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन भव्य सत्कार करण्यात आला. याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर विशेष अतिथी म्हणून प्रसिध्द पार्श्वगायिका वैशाली माडे, प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

**युवा शक्ती ही देशाची ताकद – वैशाली माडे**

प्रसिध्द गायिका वैशाली माडे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना म्हणाल्या, जीवनात गुरूचे अधिक महत्व आहे. गुरूंमुळेच मी घडले आणि माझे स्वप्न पूर्णत्वास आले. आपल्या गुरूंची कौतुकाची थाप नेहमीच आपल्या पाठीवर राहिली आहे, असे सांगून युवा शक्ती हीच देशाची मोठी ताकद आहे. बक्षिस हे खरे तर प्रोत्साहन असते, असेच पुरस्कार विद्यार्थ्यांनी मिळवावे, असे आवाहन त्यांनी केले. यावेळी त्यांनी चित्रपटामध्ये गायिलेले पिंगा .. हे गाणे देखील सादर केले.

मनोगत व्यक्त करतांना व्य.प. सदस्य डॉ. रविंद्र कडू म्हणाले, विद्यार्थ्यांनो, स्वप्न पहा आणि ते पूर्ण करा. अमरावतीची हीच परंपरा राहिलेली आहे. अमरावती विद्यापीठाचे नाव सदैव पुढेच राहिले आहे, त्यासाठी अनेकांनी मोठे योगदान दिले आहे, असे सांगून त्यांना सर्व विद्यार्थी कलावंतांचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीच्या शुभेच्छा दिल्या. कुलसचिव डॉ. अविनाश असनारे म्हणाले, वैशाली माडे ह्या विद्यापीठाच्या माजी विद्यार्थीनी आहेत आणि त्यांनी राष्ट्रीय स्तरावरचा पुरस्कार विद्यापीठाला मिळवून दिला आहे. गायनाच्या माध्यमातून वैशाली माडे यांनी अमरावती जिल्ह्याचा जगभरात नावलौकीक केला आहे, असे सांगून डॉ. असनारे यांनी सर्व विद्यार्थी कलावंत, साथिदार आणि चमू व्यवस्थापकांचे अभिनंदन केले.

याप्रसंगी विद्यापीठाच्यावतीने वैशाली माडे यांचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देवून कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सत्कार केला. तसेच २०२५–२६ मध्ये मध्य विभाग, अखिल भारतीय व राष्ट्रीय कव्वाली आंतर विद्यापीठ अशा विविध स्पर्धांमध्ये अभूतपूर्व यश संपादन करुन प्राविण्य प्राप्त करणा–या विद्यार्थी कलावंत कु. आस्था जोंधळेकर, कु. अनिषा शिरभाते, कु. अवंतिका काळे, कु. श्रुतिका वैद्य, कु. आनंदी गुल्हाने, कु. यशिका प्रांजळे, कु. श्रध्दा जाधव, कु. रिध्दी ठाकरे, कु. मनस्वी इंगळे, कु. भाग्यश्री कलाने, आकाश वानखडे, कु.शिवानी निकाडे, कु. नेहल आसोपा, गौरव जोंधळेकर, किश आत्राम, प्रथमेश अडाळगे, रितेश जोंधळेकर, अस्मित अकाळे, नकुल मोरे, सुमित पथरोड, सुजल पाढेन, शिवम शर्मा, प्रगती सुदा, वेदांत चौधरी, सक्षम तायडे, प्रणव कोरे, प्रसाद नालट, निखील सखे, निशांत उके, कु. गौरी राणे, कु. अनुष्का दाभाडे, कु. शरयू गावंडे, कु. रक्षा महल्ले, कु. रेणुका नळकांडे, कु. अंजली तायलकर, कु. भूमिका राऊत, कु. भाग्यश्री थोरात, सारा मुस्तफा, व्योम देशपांडे, आदित्य जोशी, कु. पुर्वा मानकर, कु. मोहिनी विश्वकर्मा, कु. आर्या देशमुख, कु. श्रावणी रोटे, ओम कराळे, कु. कल्याणी सावके, गजानन पळसकर, कु. आचल सरदार, कु. शर्वरी देशमुख, कु. ईश्वरी इंगळे, अजय हागे, कु. गौरी लड्ढा, कु. साक्षी वानखडे, कु. गौरी मलथानकर यांचा तसेच साथिदार, चमू व्यवस्थापक, प्रशिक्षक व प्रशांत ठाकरे, अमोल अढावू, प्रकाश मेश्राम, अभिजित भावे, अवधूत पाटील, निखिलेश नलोडे, डॉ. शितल बाबू, डॉ. वैशाली मेश्राम, डॉ. जयश्री कुलकर्णी, कार्तिक नंदवंशी, हितेश व्यास, अमर कातोरे अकोट, डॉ. अभिजीत अणे, डॉ. राधिका देशमुख यांचा रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन भव्य सत्कार करण्यात आला.

संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण व दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, सूत्रसंचालन श्रीकृष्ण पखाले, डॉ. शितल तायडे यांनी, तर आभार कु. श्रावणी रोटे हिने मानले. यावेळी विद्यापीठाच्यावतीने सुरू करण्यात आलेल्या उष्माघात कक्षाचा अहवाल मान्यवरांच्या हस्ते सादर करण्यात आला. कार्यक्रमाला व्य. प. सदस्य डॉ. प्रवीण रघुवंशी, विद्यापीठाच्या विविध प्राधिकारिणींचे आजी व माजी सदस्य, विद्यापीठातील अधिकारी, विद्यापीठ परिक्षेत्राच्या पाचही जिल्ह्यांमधील विविध महाविद्यालयांचे समान संधी कक्षाचे समन्वयक, विद्यार्थी विकास अधिकारी, प्राध्यापक, विद्यार्थी कलावंत मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार








# आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार
























# आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार
























# आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार
























# आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार























# आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार
























# आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार
























# आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार























# आंतर विद्यापीठ स्पर्धांमधील विजेत्या कलावंतांचा विद्यापीठात भव्य सत्कार





















# एन.सी.सी. महाराष्ट्र संचालनालयाच्या अतिरिक्त महासंचालकांची विद्यापीठाला सदिच्छा भेट ..

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचेशी विविध मुद्यांवर चर्चा



मेजर जनरल विवेक त्यागी यांचेशी वार्तालाप करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते शेजारी इतर मान्यवर

राष्ट्रीय छात्रसेना (एन.सी.सी.) महाराष्ट्र संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी मंगळवारी २५ ऑगस्ट रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला सदिच्छा भेट दिली. कुलगुरू कार्यालयात झालेल्या या भेटीदरम्यान मेजर जनरल त्यागी यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचेशी विविध मुद्यांवर सांगोपांग चर्चा केली. अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयीन युवकांपर्यंत एनसीसीचा विस्तार वाढवून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यावर विशेष भर देण्यात आला.

युवकांना ड्रोन तंत्रज्ञान, ड्रोन पायलट प्रशिक्षण, सायबर सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, एनसीसीमधील विद्यार्थीनी तसेच महिला कॅडेट्सचा सहभाग वाढवून त्यांच्यात नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसीत करणे, प्रधानमंत्री व केंद्र शासनाच्या विविध इंटर्नशिप योजनांशी कॅडेट्सना जोडून त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, मेळघाटासारख्या वैशिष्ट्यपूर्ण भौगोलिक परिसराचा व कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचा विचार करून ग्रामीण व आदिवासी भागातील युवकांपर्यंत एनसीसीचे जाळे विस्तारणे अशा विविध मुद्यांवर चर्चेदरम्यान भर देण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठातर्फे एनसीसीच्या प्रत्येक उपक्रम व विस्ताराला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने ज्ञान, प्रयोगशाळा आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन एनसीसी कॅडेट्सपर्यंत पोहोचवण्याचा मानस कुलगुरूंनी व्यक्त केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. मेहंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, एनसीसी चे ब्रिगेडीअर सचिन गवळी आदी उपस्थित होते.



मध्यभागी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते, शेजारी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, मेजर जनरल विवेक त्यागी, ब्रिगेडीअर सचिन गवळी

# कौशल्य आत्मसात करा, रोजगार निश्चित मिळेल - किरण पातुरकर

## विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद




अध्यक्षीय भाषण करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे

पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिलेली नाही. त्यामुळेच केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकास, आत्मनिर्भर भारत यांसारख्या संकल्पनांना प्रत्यक्षात उतरवून विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करावे, रोजगार निश्चित मिळेल, असे आवाहन अमरावती इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष तथा अमरावती विभागीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष श्री किरण पातुरकर यांनी विद्यार्थ्यांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील स्वामी विवेकानंद भवन येथे आयोजित'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावतीचे उपायुक्त श्री द.ल. ठाकरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावतीच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, विभागीय कृषी सहसंचालक श्री गणेश घोरपडे, अमरावती जिल्हा रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष भूषण काळमेघ, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

श्री किरण पातुरकर म्हणाले, अमरावतीच्या तरुणांना अमरावतीतच रोजगार मिळाला पाहिजे. टेक्स्टाईल पार्क, आय.टी. पार्क येत्या काही वर्षात पूर्ण होईल, त्यामुळे स्थानिकांना त्यात मोठ्या प्रमाणात रोजगारही मिळेल. स्वयंसिध्दा च्या माध्यमातून आम्ही अनेकांना स्वत:च्या पायावर उभे केले आहे, असेही ते म्हणाले. याप्रसंगी विभागीय कृषी सहसंचालक श्री गणेश घोरपडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.




उद्घाटनपर भाषण करतांना श्री किरण पातुरकर

अध्यक्षीय भाषण करतांना प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी आलेल्या संधीचा लाभ घ्या, कौशल्य आत्मसात करा, असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. विद्यापीठाचे इन्क्युबेशन सेंटर देखील तुमच्या मदतीला आहे, त्याचा लाभ घ्या, असे सांगून त्यांनी विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास विभागाचे आयोजनासाठी अभिनंदन केले. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकेतून श्री द.ल. ठाकरे यांनी रोजगार मेळावामागील भूमिका स्पष्ट केली. याप्रसंगी रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी झालेल्या उद्योजकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मुलाखतीनंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन श्री बाबासाहेब मुगले यांनी, तर आभार विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी मानले. रोजगार मेळाव्यामध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.




रोजगार मेळाव्यात निवड झालेल्या विद्यार्थ्याला ऑफर लेटर देतांना मान्यवर




रोजगार मेळाव्यात निवड झालेल्या विद्यार्थीनीला ऑफर लेटर देतांना मान्यवर




रोजगार मेळाव्याला उपस्थित विविध कंपन्यांचे प्रतिनिधी, विद्यार्थी व विद्यार्थीनी



विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींचा सत्कार करतांना प्र– कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे व इतर मान्यवर




## विद्यापीठातील आजीवन अध्ययन विभागामध्ये सहअभ्यासक्रम सुरू .. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महत्वाचे पाऊल

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागामध्ये नवीन राष्ट्रीय शैक्षणिक धोरणांतर्गत पदवी अभ्यासक्रमांमध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी सहअभ्यासक्रमांचा समावेश करण्यात आला आहे. यामध्ये आरोग्य, योगशिक्षण, क्रीडा व शारीरिक तंदुरुस्ती, सांस्कृतिक उपक्रम, राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना तसेच ललित, उपयोजित, दृश्यकला व प्रयोगशील कला असे विविध पर्याय उपलब्ध आहेत. विद्यार्थ्यांना निवडलेल्या सहअभ्यासक्रमाच्या माध्यमातून नियमित शिक्षणासोबत आरोग्य, व्यक्तिमत्त्व विकास आणि जीवनकौशल्यांशी संबंधित ज्ञान व अनुभव मिळतो. बी.एस.सी. डेटा सायन्सच्या विद्यार्थ्यांनी योगशिक्षण हा सहअभ्यासक्रम निवडल्याने त्यांना योगशास्त्रविषयाच्या सैध्दांतिक ज्ञानासोबतच प्रत्यक्ष योगाभ्यासाचे मार्गदर्शन आजीवन अध्ययन व विस्तार विभागातील एम.ए योगशास्त्र अभ्यासक्रमाच्या प्राध्यापकांकडून दिले जात आहे.

आजीवन अध्ययन व विस्तार विभागाचे संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांची प्रेरणा आणि एमसीए विभागाचे संचालक डॉ. मो. अतिक अहमद यांच्या सहकार्याने हे वर्ग घेण्यात येत आहेत. प्रा. स्वप्निल मोरे, प्रा. प्रफुल्ल गांजरे यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांना योगासने, प्राणायाम, ध्यान, शिथिलीकरण तंत्रे, तणाव व्यवस्थापन आणि आरोग्यदायी जीवनशैली याबाबत सैध्दांतिक तसेच प्रात्यक्षिक मार्गदर्शन दिले जात आहे.

तंत्रज्ञानाधारित शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी योगशिक्षणाच्या माध्यमातून शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक स्वास्थ्य, एकाग्रता आणि संतुलित जीवनशैली याबाबत जागरुकता निर्माण करण्याचा प्रयत्न केला जात आहे. योग शिक्षण हे विद्यार्थ्यांच्या शारीरिक व मानसिक तंदुरुस्तीला पूरक असून विविध कौशल्ये आत्मसात करुन रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणारे प्रभावी शिक्षण आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी योग शिक्षण हा अभ्यासक्रम आवर्जून घ्यावा. विद्यापीठातील इतर विभागांना सहअभ्यासक्रम अंतर्गत योग शिक्षण हा विषय सुरू करावयाचा असल्यास, आजीवन अध्ययन व विस्तार विभागाशी संपर्क साधावा व या उपक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संचालक डॉ. श्रीकांत पाटील यांनी केले.



## नशामुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियानाचा

# अमरावतीत उत्साहात शुभारंभ ..

### ४७५ रासेयो स्वयंसेवकांसह कार्यक्रम अधिका-यांचा सहभाग ..

# माय भारत पोर्टलवर नशामुक्तीची शपथ




उपस्थित मान्यवर

युवा व खेल मंत्रालय, भारत सरकार यांच्यावतीने आयोजित 'नशामुक्त युवा फॉर विकसित भारत संकल्प अभियान' या देशव्यापी उपक्रमाचा शुभारंभ आभासी पध्दतीने करण्यात आला. देशभरातील १२५ निवडक केंद्रांवर हा कार्यक्रम एकाच वेळी आयोजित करण्यात आला होता. महाराष्ट्रातील सात केंद्रांपैकी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागामार्फत ब्रिजलाल बियाणी महाविद्यालय, अमरावती येथे या अभियान शुभारंभ कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाला ब्रिजलाल बियाणी शिक्षा समितीचे माजी अध्यक्ष ॲड. अशोक राठी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दीपक धोटे, विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. निलेश कडू, अमरावती जिल्हा माहिती तंत्रज्ञान अधिकारी श्री मनीष कुमार प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते.

अभियानाचा शुभारंभ पंतप्रधान श्री नरेंद्रजी मोदी यांच्या हस्ते आभासी पध्दतीने झाला. यावेळी पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी युवकांनी व्यसनमुक्त जीवनशैली स्वीकारून विकसित भारताच्या उभारणीत सक्रिय योगदान देण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाच्या प्रारंभी युवा व खेल मंत्रालयाचे श्री मनसुख मालविया यांनी अभियानाची उद्दिष्टे, व्यसनमुक्त भारताची संकल्पना आणि युवकांची जबाबदारी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.



कार्यक्रमाला उपस्थित महाविद्यालयाचे विद्यार्थी व विद्यार्थीनी



आभासी उद्घाटन सोहळा संपल्यानंतर उपस्थित सर्व राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवकांना नशामुक्तीची सामुहिक शपथ देण्यात आली. प्राचार्य डॉ. दीपक धोटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना व्यसनमुक्त जीवनशैलीचे महत्त्व अधोरेखित केले. युवकांनी कोणत्याही प्रकारच्या व्यसनापासून दूर राहून शिक्षण, व्यक्तिमत्त्व विकास, सामाजिक बांधिलकी आणि राष्ट्रसेवा यासाठी स्वतःला समर्पित करावे, असे आवाहन केले. विकसित भारताच्या निर्मितीसाठी प्रत्येक युवकाने परिवर्तनाची सुरुवात स्वतःपासून करणे आवश्यक असल्याचेही त्यांनी नमूद केले.कार्यक्रमाला अमरावती शहरातील विविध महाविद्यालयांचे ४७५ राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक, २० कार्यक्रम अधिकारी यांनी सहभाग घेतला. शपथविधीनंतर सर्व स्वयंसेवकांनी माय भारत पोर्टलवर ऑनलाइन नशामुक्तीची शपथ नोंदवून ई–प्रमाणपत्र प्राप्त केले. राष्ट्रीय सेवा योजनेच्या लक्षगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. व्यसनमुक्त, सुदृढ आणि विकसित भारताच्या निर्मितीसाठी युवकांनी सक्रिय सहभाग नोंदविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त केला.

सूत्रसंचालन डॉ. मनीषा गोलच्छा यांनी, तर आभार श्री विवेक पनपालिया यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता महाविद्यालयाचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. गजानन राऊत, डॉ. मनीषा गोलच्छा, श्री विवेक पनपालिया यांनी परिश्रम घेतले.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यापीठात विविध क्रीडा स्पर्धा संपन्न ..
## विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाचे आयोजन


उद्घाटन करतांना मान्यवर

राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने याहीवर्षी विद्यापीठातील शैक्षणिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी व्हॉलीबॉल, रस्साखेच, लंगडी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय क्रीडा दिवसाचे उद्घाटन भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.संदीप वाघुळे, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे डॉ. एन. व्ही. फिरके यांच्या उपस्थितीत पार पडले.

याप्रसंगी डॉ.संदीप वाघुळे मार्गदर्शन करतांना म्हणाले, क्रीडा दिवस हा विद्यार्थ्यांमधील खेळाची आवड आणि सुप्त गुणांना वाव मिळावा, यासाठी साजरा केला जातो. या दिवशी विविध मैदानी आणि सांघिक खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. डॉ. एन. व्ही. फिरके म्हणाले, आजच्या मोबाईल आणि संगणकाच्या युगात आपण मैदानी खेळांकडे दुर्लक्ष करीत आहोत. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज व्यायाम आणि खेळासाठी वेळ दिला पाहिजे.

व्हॉलीबॉल स्पर्धेत एम. बी. ए., शारीरिक शिक्षण, हॉस्टल टीम, भौतिक शास्त्र, जीवतंत्रज्ञान, रासायनिक तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांच्या संघाने भाग घेतला. मुलींच्या लंगडी स्पर्धेत शारीरिक शिक्षण विभाग, मुलांच्या व्हॉलीबॉल स्पर्धेत शारीरिक शिक्षण टीम विजयी, तर एम. बी. ए. विभाग उपविजयी ठरला. विजेत्या संघाला मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देवून गौरविण्यात आले. बक्षीस वितरण समारंभाला रासायनिक तंत्रशास्त्र विभागाचे डॉ. प्रशांत शिंगवेकर उपस्थित होते.

राष्ट्रीय क्रीडा दिवसाबद्दल शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी विस्तृत माहिती देतांना खेळ आपल्याला जिंकण्याइतकेच हरण्याचे महत्त्वही शिकवतो. पराभवातून आपण आपल्या चुका समजून घेतो आणि पुढील वेळी अधिक चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न करतो असे सांगून खेळामुळे जीवनातील अनेक मौल्यवान धडे मिळतात, असे सांगितले. यावेळी डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे, डॉ. विजय निमकर, डॉ. निलेश इंगोले, डॉ. सौरभ त्रिपाठी, कु. सविता बावनथडे उपस्थित होते. संजीत कुमार व पायल रिठे यांनी यशस्वीरित्या कार्याक्रमाचे आयोजन केले. संचालन कु. रोजा गुरुंग व प्रज्वल ढोके यांनी, पाहुण्यांचा परिचय व आभार निखिल डोंगरे याने मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील विविध विभागाचे विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



क्रीडा स्पर्धेत विजेत्या व उपविजेत्या संघाला पुरस्कार देऊन सन्मानित करतांनाचे क्षणचित्र

# विद्यापीठातील गृहविज्ञान विभागात
# स्तनपान जनजागृती सप्ताह उत्साहात साजरा



विद्यार्थी हे उद्याचे पालक, कुटुंबाचे सदस्य, जागरूक नागरिक असून, आहार आणि आरोग्य याबाबत सर्वांप्रती सजग असायला हवे, यादृष्टीने १ ते ७ ऑगस्ट या जागतिक स्तनपान सप्ताह निमित्ताने 'ब्रेस्टफिडिंग फॉर सस्टेनेबल स्टार्टिंग लाईफ : स्ट्रेंग्थन व्हॉट वर्क्स' या थीम वर संत गाडगेबाबा विद्यापीठातील गृह विज्ञान विभागाच्या फुड सायन्स ॲन्ड न्युट्रिशन या पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांनी सप्ताहदरम्यान विविध पैलूंवर आधारित पोस्टर्सव्दारे स्तनपानविषयी जनजागृती केली.

विद्यार्थ्यांनी स्तनपानाच्या अनुषंगाने पोस्टर्सच्या माध्यमातून स्तनपान जनजागृतीचा संदेश प्रभावीपणे मांडला. तयार केलेल्या पोस्टर्समध्ये सुंदर हस्ताक्षर, आकर्षक चित्रे, प्रभावी घोषवाक्ये आणि माहितीपूर्ण संदेश यांचा कल्पकतेने वापर करण्यात आला. सदर पोस्टर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्तनपानाचे महत्त्व, आईच्या पहिल्या दुधाचे महत्त्व, दुध वाढविणारे पदार्थ, स्तनपान करण्याच्या पध्दती, फॉर्मुला मिल्क, मिल्क बँक, नवमातांनी स्तनपान करताना कोणत्या चुका टाळाव्यात, स्तनपानाबाबतचे गैरसमज दूर करणे, बॉटल फीडिंग, स्तनपान व मुदतपूर्व बाळ, वर्किंगमदर्स, मातांना कुटुंबाकडून मिळणारे सहकार्य आणि स्तनपानासाठी अनुकुल वातावरण यांसारख्या विविध बाबींव्दारे जनजागृती करण्यात आली. त्याचबरोबर मौखिक सादरीकरणाद्वारे जनजागृती केल्यामुळे हा उपक्रम केवळ पोस्टर निर्मितीपुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्य आणि सादरीकरणाच्या क्षमतेला चालना देणारा ठरला.

यावेळी गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांनी उपस्थितांना स्तनपानाबाबत मार्गदर्शन करतांना स्तनपानाचे बालकाच्या शारीरिक व मानसिक विकासातील महत्त्व, आई आणि बाळाच्या आरोग्यास होणारे फायदे, स्तनपानाबाबत योग्य माहिती, समाजातील गैरसमज दूर करणे याविषयी सविस्तर माहिती दिली. मातेला स्तनपान करताना कुटुंबातील सदस्यांनी सुध्दा मातेला मानसिक व भावनिक आधार देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री सुमित गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली सत्र १ च्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपक्रमाच्या माध्यमातून जागरुक माता, निरोगी बालक, सुदृढ कुटुंब, निरोगी समाज असा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाला विभागातील रविशा आंबेकर, दिपाली भैसे, शिल्पा इंगोले, आयतल कामदार, अनुश्री आडे, शिक्षकेतर कर्मचारी श्री अशोक हिरे, श्री वसंत इंगळे, श्री चरणदास जामठे, विद्यार्थी उपस्थित होते.



# विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागात जागतिक हत्ती दिनानिमित्त माहितीपटाचे प्रदर्शन

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभाग व इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट ॲन्ड कल्चरल हेरीटेज संस्था (इंटक) अमरावती अध्याय यांचे संयुक्त विद्यमाने जागतिक हत्ती दिवस प्राणिशास्त्र विभागात उत्साहात साजरा करण्यात आला. इंटक संस्था, नवी दिल्ली यांनी पर्यावरण मंत्रालयाच्या समवेत व सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने तयार केलेल्या 'गजलोक – वाईल्ड, सेक्रेड, इटर्नल' या माहितीपटाचे प्रथम प्रदर्शन हत्ती दिनाच्या दिवशी दिल्ली येथे पार पडले. त्याच 'गजलोक' या माहितीपटाचे प्रदर्शन प्राणिशास्त्र विभागात आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर, प्रमुख अतिथी म्हणून इंटक अमरावती अध्यायचे संयोजक तथा अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, प्राणिशास्त्र विभागाचे प्रा. विनोद नागले, इंटकचे सदस्य ॲड. राजमेहेर निशाणे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. जयंत वडतकर यांनी हत्तीदिनाचे महत्व विषद करतांना भारतात हत्तीची सद्यस्थिती, संवर्धनाची आवश्यकता व हत्तीचे संस्कृतीत असलेले महत्वाचे स्थान याविषयी माहिती दिली. तसेच हत्ती परियोजना (प्रकल्प) व इंटक संस्थेची माहिती दिली. यानिमित्ताने इंटक तर्फे तयार केलेला 'गजलोक' हा माहितीपट विद्यार्थ्यांनी पहावा तसेच इतर ठिकाणी तो दाखवावा असे आवाहन केले. हत्ती या प्राण्यांचे महत्व, त्यांचे संवर्धनाचे प्रश्न आणि आपला सांस्कृतिक वारसा म्हणून असलेले हत्तीचे महत्व माहितीपटाच्या माध्यमातून अधोरेखित केले. यावेळी सर्वांनी या माहितीपटाचा आनंद घेतला.

अध्यक्षीय भाषणात विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर यांनी हत्ती या प्राण्यांचे पर्यावरणात असलेले महत्व, मानवाशी जुळलेल्या आठवणी, संवर्धनाचे महत्व सांगितले. सूत्रसंचालन कु. स्वाती वडुरकर हिने केले. कार्यक्रमाला इंटकचे सदस्य सुमित अंबुलकर, वन्यजीव अभ्यासक अमेय ठाकरे, महेश रोकडे तसेच प्राणिशास्त्र विभागातील प्रा. अंकिता पानसरे, प्रा. प्रांजली हलामी, प्रा. ओवेस मुगल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी अविष्कार बाजड, सत्यम ढोबळे, अजय मेटकर, यश पानघाटे, वैष्णवी इंगोले, कोमल मेंढे यांनी अथक परिश्रम घेतले.



# राष्ट्रसंतांचे विचार कृतीत आणा – डॉ. सतीश तराळ ..
# विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृती
## ग्रामगीता व्याख्यानमाला संपन्न



विषयाची मांडणी करतांना व्याख्याते डॉ. सतीश तराळ

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केवळ विचार दिले नाही, तर त्यांनी समाजातील असलेली व्यसने, अंधश्रध्दा, अज्ञान, दारिद्र हे प्रत्यक्ष अनुभवले आणि त्यानंतरच त्यांनी उपदेश केला. ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील त्यांनी सांगितलेले आचारप्राबल्य जोपर्यंत आपण प्रत्यक्ष कृतीत आणणार नाही, तोपर्यंत त्याची पूर्तता होणार नाही. म्हणून राष्ट्रसंतांचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणा, असे प्रतिपादन अमरावतीचे प्रसिध्द साहित्यिक व वक्ते डॉ. सतीश तराळ यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग व वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने तिवसा येथे आयोजित प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृति ग्रामगीता व्याख्यानमाला प्रसंगी 'ग्रामगीतेतील लोकवशिकरण पंचकातील आचार प्राबल्य' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती तथा वनराईचे अमरावती अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे आचार्य हरिभाऊ विरुळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.आर. देशमुख, विद्यापीठाच्या संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना डॉ. सतीश तराळ म्हणाले, चारित्र्य आणि आत्मशुध्दी खूप महत्वाची आहे. लोकांना तत्वज्ञान सांगणे आणि प्रबोधन करणे सोपे आहे, परंतु त्याप्रमाणे स्वत:चे जीवन जगणे अत्यंत कठीण आहे. आज देशामध्ये असलेली परिस्थिती बिघडत चालली असून अशा बिघडलेल्या परिस्थितीमध्ये गाव सुधारण्याचा किंवा निर्माण करण्याचा एकमेव उपाय म्हणजे आत्मशुध्दी होय. ज्या व्यक्तींची आत्मशुध्दी झाली आहे, त्यांचे चारित्र्य शुध्द आहे, त्याच व्यक्तींच्या मागे लोकं जातात आणि त्यांचे ऐकतात. परंतु यासाठी दुस–यांना उपदेश करण्यापूर्वी प्रत्येकाने स्वत:ची जीवनचर्या, साधना आणि आपले जीवन तपासून पाहिले पाहिजे. व्यक्तींमध्ये युक्ती आणि विचारचारित्र्य असणे आवश्यक आहे. नुसते लोकांना व्यसन सोडण्याचा किंवा सुधारण्याचा उपदेश करुन चालत नाही.तर त्याप्रमाणे स्वत: कृती करण्याची गरज आहे.

स्वत:चे चारित्र्य आणि पात्रता निर्माण करण्यासाठी स्वत:पासून सुरुवात केली पाहिजे. संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गोविंद प्रभू, महात्मा गांधी, शामरावदादा मोकदम, महात्मा फुले, नरेंद्र दाभोळकर यांनी प्रत्यक्ष कृती केली आणि त्यानंतर समाजाला उपदेश दिला. गोविंद प्रभू यांनी सहाशे वर्षाआधी समाजपरिवर्तनाचे कार्य केले. संत गाडगे बाबांनी बारा वर्ष समाजात राहुन भटकंती व साधना केली आणि त्यातून ते शिकले, समाजाची नाळ त्यांनी ओळखली. समाजाला कशाची गरज आहे, हे ओळखून आणि दशसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी रोकडा धर्म दिला. राष्ट्रपिता महात्मा गांधी जगभर फिरले. समाजाच्या काय समस्या आहेत, त्या त्यांनी जाणून घेतल्या आणि भारतीय स्वातंत्र्यासाठी लढा दिला. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुध्दा केवळ उपदेश केला नाही, तर स्वत: प्रत्यक्ष कृती करुन समाजासमोर आदर्श निर्माण केला, विचार मांडले.

शामरावदादांनी राष्ट्रसंतांच्या मार्गदर्शनाखाली आरती मंडळ स्थापन करण्याचे महत्वाचे कार्य प्रत्यक्ष कृतीतून केले. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी आणि लोकांमध्ये राष्ट्रभक्तीची व बलिदानाची भावना जागृत करण्यासाठी शामरावदादांनी गावोगावी जावून प्रचार केला. राष्ट्रसंतांचे संपूर्ण जीवन हे प्रत्यक्ष कृती आणि आचार प्राबल्यावर आधारित होते. त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून समाजप्रबोधन केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे केवळ महाराष्ट्र आणि भारतापूरतेच मर्यादीत नसून ते जगातील एक महान विश्वसंत आहेत. स्वामी विवेकानंदांनी शिकागो धर्मपरिषदेत विचार मांडले. तर राष्ट्रसंतांनी सुध्दा जपान येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत विचार मांडले. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केवळ गावाच्या विकासासाठी विचार मांडले नाही, तर गांव हा विश्वाचा नकाशा मानून संपूर्ण जगाचे स्वरुप बदलण्याची क्षमता त्यांच्या विचारात दिसून येते. त्यांची देव आणि धर्माची संकल्पना मानवतावादी होती. राष्ट्रसंतांचे संपूर्ण जीवन हे कर्मयज्ञ, कृतीयज्ञ आणि आचारधर्माचे मूर्तीमंत रुप होते, असेही त्यांनी सांगितले. यावेळी श्री मधुभाऊ घारड व श्री हरिभाऊ विरुळकर यांनीही मनोगत व्यक्त केले.अध्यक्षीय भाषणात प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, संतांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे आणि विद्यापीठाचा विद्यार्थी चारित्र्यसंपन्न घडावा, भारताच्या विकासामध्ये त्याचे योगदान रहावे, याकरिता अभ्यासासोबतच संतांचे विचार त्यांच्यापर्यंत पोहचावे, या उद्देशाने विद्यापीठाच्यावतीने अशाप्रकारच्या व्याख्यानमालांचे आयोजन केल्या जाते. डॉ. सतीश तराळ यांनी ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील आचारप्राबल्य हा विषय अतिशय सोप्या भाषेत विद्यार्थ्यांसमोर मांडला. संतानी समाजाला केवळ विचार दिले नाहीत, तर प्रत्यक्ष त्यांनी कृती केली आणि कृतीतून समाजाला पटेल असे विचार मांडले, विद्यार्थ्यांनी सुध्दा प्रत्यक्ष कृती करावी आणि आपले जीवन समृध्द कसे होईल यावर भर द्यावा, असेही ते म्हणाले

संत गाडगे बाबा, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, शामरावदादा मोकदम व यादवराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीत व संस्थागीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी शामराव मोकदम यांच्यावरील पुस्तकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. सतीश तराळ यांनी महाविद्यालयाला त्यांनी लिहिलेली पुस्तके भेट दिली. स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, सूत्रसंचालन प्रा. विनोद खडसे, तर आभार ग्रंथपाल प्रा. रविंद्र पाटील यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, राष्ट्रसंतांचे भाविक भक्त, मोकदम कुटुंबातील सदस्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# अमरावतीत स्टार्ट-अप एक्स्पो - २०२६ उत्साहात संपन्न ..

## नवउद्योजक, स्टार्टअप व इनोव्हेटर्सचा उत्स्फूर्त सहभाग



उद्घाटन करतांना मान्यवर

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन (एसआरआयएफ) च्या वतीन व नवराष्ट्र युथ फाऊंडेशन यांच्या सहकार्याने आयोजित स्टार्ट-अप एक्स्पो - २०२६ हा भव्य उपक्रम अमरावती शहरातील सायन्सकोर मैदान येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. हा एक्स्पो अमरावती युथ फेस्टिवल - २०२६ चा एक महत्त्वाचा भाग होता.

या स्टार्ट-अप एक्स्पोमध्ये अमरावतीसह विदर्भातील नवउद्योजक, स्टार्टअप्स, इनोव्हेटर्स, विद्यार्थी व युवा उद्योजकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदविला. सहभागी स्टार्टअप्सनी आपल्या नाविन्यपूर्ण कल्पना, उत्पादने, प्रोटोटाइप, बिझनेस मॉडेल्स आणि व्यवसाय योजनांचे आकर्षक स्टॉलच्या माध्यमातून प्रदर्शन केले. नागरिक, विद्यार्थी आणि युवा वर्गाने स्टॉल्सना भेटी देऊन विविध नवकल्पनांची माहिती घेतली.

### मान्यवरांच्या उपस्थितीत उद्घाटन

स्टार्ट-अप एक्स्पोचा उद्घाटन समारंभ मोठ्या उत्साहात पार पडला. यावेळी जिल्हा उद्योग केंद्र, अमरावतीचे श्री निलेश निकम, विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापनचे अधिष्ठाता प्रा. अरुण हराणे, इन्क्युबेशन फाऊंडेशनच्या प्रमुख व संचालक प्रा. स्वाती शेरेकर तसेच नवराष्ट्र युथ फाऊंडेशन चे संस्थापक श्री हिमांशू पाटील, श्री संकल्प गवई, इन्क्युबेशन सेंटरचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, व्यवस्थापक श्री अमोल हिरुळकर प्रामुख्याने उपस्थित होते. मान्यवरांनी स्टार्टअप्सच्या स्टॉल्सना भेट देऊन त्यांच्या उत्पादने, तंत्रज्ञान व व्यवसाय संकल्पनांची माहिती घेतली. युवा उद्योजकांच्या नाविन्यपूर्ण प्रयत्नांचे कौतुक करताना विदर्भामध्ये सक्षम स्टार्टअप इकोसिस्टिम विकसित करण्यासाठी अशा उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले.



### तज्ज्ञांकडून परिक्षण

स्टार्टअप्सच्या नाविन्यपूर्ण कल्पना, उत्पादनांची क्षमता, व्यवसाय मॉडेल, बाजारपेठेची शक्यता आणि उद्योजकीय दृष्टिकोनाचे मूल्यांकन करण्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ रायजिरा हॉटेल मॅनेजमेंटचे अखिलेश राठी, खत्री ॲन्ड असोसिएट्सचे सी.एस. खत्री, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग ॲन्ड मॅनेजमेंटचे प्रतिक देशमुख,एफएमसीजी तज्ज्ञ गोपाल पांडे, विद्यापीठाच्या केमटेकचे प्रशांत शिंग्वेकर, सीए दिपक झंवर परीक्षक म्हणून उपस्थित होते. या तज्ज्ञांनी स्टार्टअप्सशी संवाद साधून त्यांच्या व्यवसाय कल्पना, उत्पादनांची उपयुक्तता, बाजारपेठेतील संधी आणि भविष्यातील विस्ताराच्या शक्यता याबाबत मार्गदर्शन केले.

### ईव्ही बुलेट ठरले एक्स्पोचे प्रमुख आकर्षण

या स्टार्ट–अप एक्स्पोमध्ये रेव्ह इन्नोव्हेशन प्रा. लि. या कंपनीने अमरावतीत प्रथमच मॅन्युफॅक्चर केलेले इव्ही बुलेट मुख्य आकर्षण ठरले. कंपनीने आपल्या इलेक्ट्रिक बुलेटचे विविध मॉडेल्स एक्स्पोमध्ये प्रदर्शित केले.









प्रदर्शनातील विविध स्टॉल्सला भेट देवून माहिती घेतांना मान्यवर

# शिक्षणातील नवकल्पनेला विद्यापीठाच्या रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशनचा हातभार ..
# मेधा वाटिका एडलॅब्स प्रा.लि. ला स्टार्टअप इंडिया सीड फंड अंतर्गत अर्थसहाय्य ..
# रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन व मेधा वाटिका एडलॅब्स प्रा.लि. यांच्यात करारनामा




शिक्षण क्षेत्रातील नवकल्पना, तंत्रज्ञान आणि उद्योजकतेला चालना देण्याच्या दृष्टीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन (एसआरआयएफ) ने आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. स्टार्टअप इंडिया सीड फंड स्किम अंतर्गत रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशनला मंजूर झालेल्या सीड फंडमधून मेधा वाटिका एडलॅब्स प्रा.लि. या स्टार्टअपला अर्थसहाय्य देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.

या अर्थसहाय्याच्या अनुषंगाने रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशन यांच्यातील करारनाम्यावर स्वाक्ष–या करण्यात आल्या. या प्रसंगी इनक्युबेशन सेंटर प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, व्यवस्थापक श्री अमोल हिरुळकर, मेधा वाटिका एडलॅब्स प्रा.लि. च्या संचालक डॉ. केतकी कलेले व श्री राहुल चुटे उपस्थित होते.

मेधा वाटिका एडलॅब्स प्रा.लि. ही शिक्षण क्षेत्रात डिजीटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारी नाविन्यपूर्ण एडटेक स्टार्टअप असून, विद्यार्थ्यांसाठी डिजीटल सायन्स, मॅथेमेटिक्स आणि लँग्वेज लॅब विकसित करण्याचे कार्य करते. जेमिफिकेशन, स्टोरीटेलिंग, सिम्युलेशन्स आणि हॅन्डसब ऑन लर्निंग यांसारख्या आधुनिक पध्दतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अधिक मनोरंजक, संवादात्मक आणि अनुभवाधारित शिक्षण देण्यावर कंपनीचा भर आहे. स्टार्टअप इंडिया सीड फंड स्किम अंतर्गत प्राप्त निधीतून मेधा वाटिका एडलॅब्स प्रा.लि. ला उपलब्ध करुन देण्यात येणा–या अर्थसहाय्यामुळे कंपनीच्या तंत्रज्ञान विकास, एडटेक उत्पादनांचा विस्तार तसेच नाविन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीला महत्त्वपूर्ण चालना मिळणार आहे. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाधारित व अनुभवात्मक शिक्षण अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यास या निधीचा उपयोग होणार आहे.

रिसर्च अँड इनक्युबेशन फाऊंडेशनमार्फत स्टार्टअप्सना केवळ इनक्युबेशन व मार्गदर्शनच नव्हे, तर शासनाच्या विविध योजनांच्या माध्यमातून आर्थिक पाठबळ उपलब्ध करून देण्यात येत आहे. मेधा वाटिका एडलॅब्स प्रा.लि. ला मिळालेले हे अर्थसहाय्य विद्यापीठाच्या इन्नोव्हेशन टू एन्टरप्राईज या दिशेने सुरू असलेल्या प्रयत्नांचे महत्त्वपूर्ण उदाहरण ठरत आहे. या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी मेधा वाटिका एडलॅब्स प्रा.लि. च्या टीमचे अभिनंदन करून त्यांच्या नाविन्यपूर्ण उपक्रमास पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# कर्मचा-यांच्या समर्पणामुळेच विद्यापीठाची जागतिक पातळीवर घोडदौड ..
# 'क्यूएस' रँकिंगमध्ये पटकावले मानाचे स्थान - कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते ..

## विद्यापीठ सेवेतून सेवानिवृत्त कर्मचा-यांचा 'कर्तव्यपूर्ती सोहळा' संपन्न



अध्यक्षीय भाषण करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

अनेक प्रशासकीय अडचणी, लाल फीतीचा कारभार आणि रिक्त पदांची वानवा असतानाही, विद्यापीठाच्या अधिकारी व कर्मचा-यांच्या अहोरात्र कष्टांमुळे विद्यापीठाने मानाच्या 'क्यूएस वर्ल्ड रँकिंग' मध्ये जागतिक स्तरावर १०००-१२०० च्या व दक्षिण आशियात ३३० व्या क्रमांकावर मजल मारली आहे. पदे रिक्त असतानाही कर्मचा-यांनी दोन ते तीन टेबलचे काम आणि अतिरिक्त जबाबदा-या सांभाळत विद्यापीठाचा कारभार सुरळीत ठेवला. अडचणींवर मात करत कर्मचा-यांच्या उत्कृष्ट सहकार्यामुळे आज विद्यापीठाला हे जागतिक यश प्राप्त झाले आहे. संपूर्ण आशिया खंडात १००० ते १२०० च्या बँडमध्ये विद्यापीठाचा समावेश झाला असून, दक्षिण आशियात विद्यापीठ ३३० व्या क्रमांकावर आले आहे. ही अत्यंत प्रतिष्ठित मानली जाणारी रँकिंग आहे. भविष्यातही अधिकारी आणि कर्मचारी यांच्या याच सहकार्यामुळे विद्यापीठाचा प्रवास अधिक गतीने होईल आणि संस्था उत्तरोत्तर प्रगती करेल. अनेक संकटांचा सामना करत विद्यापीठाने गाठलेले हे उच्च शिखर संपूर्ण विद्यापीठ परिवारासाठी अभिमानास्पद असल्याचे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील सेवानिवृत्त कर्मचा-यांसाठी आयोजित 'कर्तव्यपूर्ती सोहळ्यात' अध्यक्षीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर प्रमुख अतिथी म्हणून प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. विद्या शर्मा, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, नियंत्रण अधिकारी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच सत्कारमूर्ती श्री गणेश गोविंदराव व्यवहारे, सौ. व्यवहारे, सौ. अंजली देवानंद गणोरकर, श्री देवानंद गणोरकर, सौ. रजनी सुनिल चपाटे, श्री सुनिल चपाटे, विद्यापीठ कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख उपस्थित होते.

यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी सर्व सत्कारमूर्तींचा शाल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह, गौरव प्रमाणपत्र देऊन, तर सौ. व्यवहारे यांचा सौ. मोनाली तोटे पाटील, सौ. अंजली गणोरकर यांचा सौ. पुनम जाधव, सौ. रजनी चपाटे यांचा सौ. मनिषा कु-हेकर यांनी साडी-चोळी व कुंकवाचा करंडा देवून सत्कार केला.

प्रमुख अतिथी डॉ. विद्या शर्मा म्हणाल्या, सेवानिवृत्तीचा एक प्रवास संपला असला तरी आता खरा प्रवास सुरू झाला आहे. या प्रवासादरम्यान आपण खूप काही शिकलो, अनुभवले. आता दुस-या प्रवासासाठी सुध्दा आपण तयार असले पाहिजे. महिलांना अतिशय धावपळीचे काम करावे लागते. त्यामुळे आरोग्याकडे दुर्लक्ष होते.



व्यासपीठावर उपस्थित मान्यवर

परंतु आरोग्याकडे अधिक लक्ष द्यावे असे सांगून डॉ. शर्मा यांनी सर्व सत्कारमूर्तींना निरामय आरोग्याच्या शुभेच्छा दिल्या. कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष श्री अजय देशमुख, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. नितीन कोळी यांनीही आपल्या मनोगतातून सत्कारमूर्तींना उज्वल भविष्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी सत्कारमूर्ती श्री गणेश व्यवहारे, सौ. अंजली गणोरकर, सौ. रजनी चपाटे यांनी आपल्या मनोगतातून सेवाकाळात सहका-यांकडून मिळालेला प्रेम, आदरभाव याबद्दल सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करुन सेवाकाळात केलेल्या कार्याची त्यांनी माहिती दिली.

राष्ट्रगीत व विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. विद्यापीठ कर्मचारी पतसंस्थेच्यावतीने कोषाध्यक्ष श्री राजेश एडले, सौ. प्रज्ञा बोंडे, डॉ. नितीन कोळी यांनी सत्कारमूर्तींचा भागभांडवलाचा धनादेश व पुस्तक देऊन सत्कार केला. प्रास्ताविक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, तर आभार अधीक्षक डॉ. धनंजय पाटील यांनी मानले. कार्यक्रमाला विद्यापीठातील शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, अधिकारी, कर्मचारी, शिक्षक, सेवानिवृत्त कर्मचारी तसेच सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य उपस्थित होते.



व्य.प.सदस्य डॉ. विद्या शर्मा मार्गदर्शन करतांना



प्रास्ताविकातून सत्कारमूर्तींच्या कार्याला उजाळा देतांना कुलसचिव डॉ. अविनाश असनारे

# सत्कारमूर्ती



कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याहस्ते सेवानिवृत्त श्री गणेश गोविंदराव व्यवहारे यांचा उभयता सत्कार



कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याहस्ते सेवानिवृत्त सौ. रजनी सुनील चपाटे यांचा उभयता सत्कार



कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याहस्ते सेवानिवृत्त सौ. अंजली देवानंद गणोरकर यांचा उभयता सत्कार

# विद्यापीठात साहित्यरत्न श्री अण्णाभाऊ साठे जयंती साजरी



कामगार नेते, कथा, कादंबरीकार, कवी, नाट्य कलावंत, लोकशाहीर, साहित्यसम्राट श्री अण्णाभाऊ साठे यांची जयंती संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी श्री अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला प्र–कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव (मा.क.) डॉ. दादाराव चव्हाण, उपअभियंता (विद्युत) श्री राजेश एडले, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. संचालन व श्री अण्णाभाऊ साठे यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.



# विद्यापीठात क्रांतीसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठात थोर सेनानी क्रांतीसिंह नाना पाटील यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांनी क्रांतीसिंह नाना पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पार्पण करुन विद्यापीठाच्यावतीने अभिवादन केले. जयंती कार्यक्रमाला उपकुलसचिव (आस्थापना) श्री मंगेश वरखेडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तसेच विद्यापीठातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. संचालन व क्रांतीसिंह नाना पाटील यांच्याबद्दल माहिती जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी दिली.

पुण्य नगरी

# विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंट, बायोमेली कंपनी, अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सामंजस्य करार

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटर, ठाणे येथील विज्ञानाधारित स्टार्टअप बायोमेली प्रा. लि. कंपनी आणि बुलडाणा जिल्ह्यातील चिखली येथील अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला.




या करारांतर्गत बायोमेली प्रा. लि. ही कंपनी आता विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरची अधिकृत इन्क्युबेटी कंपनी म्हणून जोडली गेली आहे. तर अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयात प्री-इन्क्युबेशन सेंटर स्थापन करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना व्यवसायात रुपांतरित करण्यासाठी त्यामार्फत आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, उद्योग तज्ज्ञांचे मार्गदर्शन, स्टार्टअप उभारणीसाठी आवश्यक साहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे. याशिवाय, विविध स्टार्टअप कंपन्यांमध्ये अनुराधा अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, प्रत्यक्ष उद्योग अनुभव आणि स्टार्टअप इकोसिस्टममध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उद्योगविश्वाचा अनुभव मिळणार असून रोजगारक्षमतेतही मोठी वाढ होणार आहे.

हिंदुस्थान

# विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरचा बायोमेली प्रा.लि. व अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सामंजस्य करार

अमरावती दि. ४ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटर (रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन) चा ठाणे येथील विज्ञानाधारित स्टार्टअप 'बायोमेली प्रा. लि.' कंपनी आणि बुलढाणा जिल्हातील चिखली येथील अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत 'बायोमेली प्रा.लि.' ही कंपनी आता विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरची अधिकृत 'इन्क्युबेटी' कंपनी म्हणून जोडली गेली आहे. तर अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयात 'प्री-इन्क्युबेशन सेंटर' स्थापन करण्यात येणार असून, विद्याथ्र्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यवसायात रुपांतरित करण्यासांठी इन्क्युबेशन सेंटरतर्फे आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, उद्योग तज्ज्ञांचे मार्गदर्शन, स्टार्टअप उभारणीसाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.याशिवाय, विविध स्टार्टअप कंपन्यांमध्ये अनुराधा अभियांत्रिकीच्या विद्याथ्र्यांना इंटर्नशिप, प्रत्यक्ष उद्योग अनुभव आणि स्टार्टअप इकोसिस्टममध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्याथ्र्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उद्योगविश्वाचा अनुभव मिळणार असून रोजगारक्षमतेतही मोठी वाढ होणार आहे.




बायोमेली प्रा.लि. ही कंपनी विज्ञानावर आधारित, उच्च गुणवत्ता व बहुउद्देशीय पर्सनल केअर उत्पादने तयार करते. ही उत्पादने त्वचेच्या आरोग्यासाठी अत्यंत सुरक्षित व प्रभावी मानली जातात. इन्क्युबेशन सेंटरकडून या स्टार्टअपला व्यावसायिक मार्गदर्शन, अत्याधुनिक लॅब सुविधा, कार्यालयीन जागा, गुंतवणूकदारांचे नेटवर्क, पेटंट आणि निधी उभारणीसाठी आवश्यक सर्व तांत्रिक व कायदेशीर सहकार्य पुरविले जाणार आहे. रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन अध्यक्ष व संचालक कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व संचालक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या मार्गदर्शानाखाली सातत्याने उत्तोरोत्तर प्रगती करीत आहे.

करारानुसार दोन्ही संस्था संयुक्तपणे स्टार्टअप बूटकॅम्प, कार्यशाळा, चर्चासत्रे, हॅकाथॉन, इन्नोव्हेशन चॅलेंज, तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र, कॉन्फरन्स आणि उद्योजकता विकास कार्यक्रम आयोजित करणार आहेत. यामुळे विद्याथ्र्यांमध्ये संशोधनवृत्ती, नवोपक्रम आणि स्वयंरोजगाराची प्रेरणा निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच, दोन्ही संस्थांमधील प्राध्यापक आणि विद्यार्थी संयुक्त संशोधन प्रकल्पांवर काम करणार असून प्रयोगशाळा, संशोधन सुविधा, तांत्रिक संसाधने आणि शैक्षणिक कौशल्यांची देवाणघेवाण करण्यात येणार आहे. उद्योगाभिमुख संशोधन आणि तंत्रज्ञान विकासाला चालना देण्यासाठी हा करार महत्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे.या प्रसंगी मान्यवरांनी सांगितले की, विद्याथ्र्यांमध्ये संशोधन, नवोपक्रम आणि उद्योजकतेची संस्कृती रुजविण्यासाठी शैक्षणिक संस्था आणि इन्क्युबेशन सेंटर यांच्यातील सहकार्य अत्यंत आवश्यक आहे.

या सामंजस्य करारामुळे विशेषतः ग्रामीण व स्थानिक भागातील विद्याथ्र्यांना स्वतःचे स्टार्टअप उभारण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, संसाधने, उद्योग क्षेत्राशी संपर्क आणि आर्थिक संधी उपलब्ध होतील. भविष्यात या भागीदारीतून अनेक यशस्वी स्टार्टअप्स आणि रोजगारनिर्मिती करणारे युवा उद्योजक घडतील, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. या करारावर इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक व प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव यांनी स्वाक्षरी केली. तर अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्यावतीने महाविद्यालयाचे संचालक डॉ. एम. एस. अली यांनी स्वाक्षरी केली. यावेळी श्री इन्क्युबेशन सेंटरचे व्यवस्थापक अमोल हिरुळकर साक्षीदार म्हणून उपस्थित होते. सामंजस्य करारावेळी बायोमेली प्रा.लि. तर्फे संचालक श्री अभिषेक कुमार, सहसंस्थापक व सीओओ श्री वर्चस मम्मानिया उपस्थित होते.

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सत्य

# विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरचा बायोमेली प्रा.लि. व अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयामध्ये सामंजस्य करार

**अमरावती/का.प्र**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटर (रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन) चा ठाणे येथील विज्ञानाधारित स्टार्टअप 'बायोमेली प्रा. लि.' कंपनी आणि बुलढाणा जिल्हातील चिखली येथील अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालय यांच्यात नुकताच सामंजस्य करार करण्यात आला. या करारांतर्गत 'बायोमेली प्रा.लि.' ही कंपनी आता विद्यापीठाच्या इन्क्युबेशन सेंटरची अधिकृत 'इन्क्युबेटी' कंपनी म्हणून जोडली गेली आहे. तर अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयात 'प्री-इन्क्युबेशन सेंटर' स्थापन करण्यात येणार असून, विद्यार्थ्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यवसायात रुपांतरित




करण्यासाठी इन्क्युबेशन सेंटरतर्फे आवश्यक तांत्रिक मार्गदर्शन, उद्योग तज्ज्ञांचे मार्गदर्शन, स्टार्टअप उभारणीसाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून दिले जाणार आहे.याशिवाय, विविध स्टार्टअप कंपन्यांमध्ये अनुराधा अभियांत्रिकीच्या विद्यार्थ्यांना इंटर्नशिप, प्रत्यक्ष उद्योग अनुभव आणि स्टार्टअप इकोसिस्टममध्ये काम करण्याची संधी मिळणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना केवळ शैक्षणिक ज्ञानापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष उद्योगविश्वाचा अनुभव मिळणार असून रोजगारक्षमतेतही मोठी वाढ होणार आहे.

बायोमेली प्रा.लि. ही कंपनी विज्ञानावर आधारित, उच्च गुणवत्ता व बहुउद्देशीय पर्सनल केअर उत्पादने तयार करते. ही उत्पादने त्वचेच्या आरोग्यासाठी अत्यंत सुरक्षित व प्रभावी मानली जातात. इन्क्युबेशन सेंटरकडून या स्टार्टअपला व्यावसायिक मार्गदर्शन, अत्याधुनिक लॅब सुविधा, कार्यालयीन जागा, गुंतवणूकदारांचे नेटवर्क, पेटंट आणि निधी उभारणीसाठी आवश्यक सर्व तांत्रिक व कायदेशीर सहकार्य पुरविले जाणार आहे. रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन अध्यक्ष व संचालक कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व संचालक कुलसचिव डॉ. अविनाश असनारे यांच्या मार्गदर्शनाखाली सातत्याने उत्तोरोत्तर प्रगती करीत आहे.करारानुसार दोन्ही संस्था संयुक्तपणे स्टार्टअप बूटकॅम्प, कार्यशाळा, चर्चासत्रे, हॅकार्थॉन, इन्नोव्हेशन चॅलेंज, तज्ज्ञांचे मार्गदर्शन सत्र, कॉन्फरन्स आणि उद्योजकता विकास कार्यक्रम आयोजित करणार आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये संशोधनवृत्ती, नवोपक्रम आणि स्वयंरोजगाराची प्रेरणा निर्माण होण्यास मोठी मदत होणार आहे. तसेच, दोन्ही संस्थांमधील प्राध्यापक आणि विद्यार्थी संयुक्त संशोधन प्रकल्पांवर काम करणार असून प्रयोगशाळा, संशोधन सुविधा, तांत्रिक संसाधने आणि शैक्षणिक कौशल्यांची देवाणघेवाण करण्यात येणार आहे. उद्योगाभिमुख संशोधन आणि तंत्रज्ञान विकासाला चालना देण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे मानले जात आहे.

सामंजस्य करारामुळे विशेषतः ग्रामीण व स्थानिक भागातील विद्यार्थ्यांना स्वतःचे स्टार्टअप उभारण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन, संसाधने, उद्योग क्षेत्राशी संपर्क आणि आर्थिक संधी उपलब्ध होतील. भविष्यात या भागीदारीतून अनेक यशस्वी स्टार्टअप्स आणि रोजगारनिर्मिती करणारे युवा उद्योजक घडतील,' असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला. या करारावर इन्क्युबेशन सेंटरच्या संचालक व प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव यांनी स्वाक्षरी केली. तर अनुराधा अभियांत्रिकी महाविद्यालयाच्यावतीने महाविद्यालयाचे संचालक डॉ. एम. एस. अली यांनी स्वाक्षरी केली. यावेळी इन्क्युबेशन सेंटरचे व्यवस्थापक अमोल हिरुळकर साक्षीदार म्हणून उपस्थित होते. सामंजस्य करारावेळी बायोमेली प्रा.लि. तर्फे संचालक अभिषेक कुमार, सहसंस्थापक व सीओओ श्री वर्चस मम्मानिया उपस्थित होते.

तरुण भारत

# उच्च शिक्षण, संशोधन क्षेत्रात अमरावती विद्यापीठाचे यश

## क्युएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये स्थान

**अमरावती, ५ ऑगस्ट**

जागतिक स्तरावरील अत्यंत प्रतिष्ठित 'क्युएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६' मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी करत दमदार झेप घेतली आहे. विद्यापीठाने आशिया खंडात १००१-११०० च्या बँडमध्ये, तर दक्षिण आशियात ३३० वा क्रमांक पटकावून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. 'क्युएस वल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ इयरबुक'मध्ये विद्यापीठाच्या या यशाची अधिकृत नोंद घेण्यात आली आहे.

कुलगुरू डॉ. बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या




अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, नवोपक्रम, विद्यार्थी विकास आणि आंतरराष्ट्रीय निकषांची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी केली. या कक्षाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी विविध उपक्रमांचा पाठपुरावा केला. गेल्या दोन वर्षात अंतर्गत गुणवत्ता कक्षामार्फत विद्यापीठात महत्त्वाचे सकारात्मक बदल घडवून आणण्यात आलेत. प्रत्येक शिक्षकासाठी दरवर्षी किमान तीन दर्जेदार संशोधन निबंध प्रकाशित करण्याचे धोरण आखण्यात आले. स्कोपस, डब्ल्यूओएस आणि यूजीसीच्या निकषांनुसार संशोधनाचे अंतर्गत परीक्षण सुरू करण्यात आले. सर्व विभागांमध्ये मूल्यवर्धित कोर्सेसची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली. एपीआय प्रमाणपत्र प्रणाली आणि सीएएस (करिअर अँडव्हान्समेंट स्कीम) प्रक्रियेला गती तसेच परीक्षेचे निकाल जाहीर करण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करण्यात आला. त्याचबरोबर 'स्कुल कनेक्ट' कार्यक्रम, संलग्न महाविद्यालयांच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे मार्गदर्शन, माजी विद्यार्थ्यांचा सहभाग आणि उद्योग जगतासोबतच्या सामंजस्य करारांमध्ये वाढ करण्यात आली. संशोधन आणि विद्यार्थी विकासात सकारात्मक बदल या उपक्रमांमुळे विद्यापीठातील उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधील संशोधन प्रकाशनात मोठी वाढ झाली आहे.

> "हे यश विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, संशोधक, विद्यार्थी आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम आणि उद्योग सहकार्यावर अधिक भर देत अमरावती विद्यापीठाला जागतिक स्तरावर नवीन उंचीवर नेण्याचा आमचा संकल्प आहे."
>
> **- डॉ. मिलिंद बारहाते**
> कुलगुरू, अमरावती विद्यापीठ

याशिवाय पेटंट्सची संख्या, संशोधन फेलोची संख्या, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, उच्च शिक्षणातील प्रवेश, आणि क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीत कमालीची सुधारणा दिसून येत आहे. (तभा वृत्तसेवा)

## अमरावती इव्हिनिंग

# क्यु.एस. आशिया युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये अमरावती विद्यापीठाची उत्तुंग भरारी

अमरावती दि. ५ :- जागतिक स्तरावरील अत्यंत प्रतिष्ठित मानाच्या 'क्युएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६' मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी करत दमदार झेप घेतली आहे. विद्यापीठाने आशिया खंडात १००१-११०० च्या बँडमध्ये, तर दक्षिण आशियात ३३० वा क्रमांक पटकावून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. 'क्युएस वल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ इयरबुक'मध्ये विद्यापीठाच्या या यशाची अधिकृत नोंद घेण्यात आली आहे. विशेष म्हणजे या यादीत भारतातील २९४ संस्थांनी आपले नाव झळकावले आहे.

### कुशल नेतृत्व आणि नियोजनबद्ध धोरणांचे यश

विद्यापीठाच्या या ऐतिहासिक यशामागे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे दूरदर्शी नेतृत्व, गुणवत्ताकेंद्रित धोरणे आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यांचा मोलाचा वाटा आहे. कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, नवोपक्रम, विद्यार्थी विकास आणि आंतरराष्ट्रीय निकषांची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी केली. अंतर्गत गुणवत्ता कक्षा चे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी विविध उपक्रमांचा पाठपुरावा केला.

### गुणवत्ता वाढीसाठी राबवलेले महत्त्वपूर्ण उपक्रम

गेल्या दोन वर्षात अंतर्गत गुणवत्ता कक्षामार्फत विद्यापीठात महत्त्वाचे सकारात्मक बदल घडवून आणण्यात आलेत. प्रत्येक शिक्षकासाठी दरवर्षी किमान तीन दर्जेदार संशोधन निबंध प्रकाशित करण्याचे धोरण आखण्यात आले. स्कोपस, डब्ल्यूओएस आणि यूजीसी च्या निकषांनुसार संशोधनाचे अंतर्गत परीक्षण सुरू करण्यात आले. सर्व विभागांमध्ये व्हॅल्यू ॲडेड (मूल्यवर्धित) कोर्सेसची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली. एपीआय प्रमाणपत्र प्रणाली आणि सीएएस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) प्रक्रियेला गती तसेच परीक्षेचे निकाल जाहीर करण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करण्यात आला. त्याचबरोबर 'स्कुल कनेक्ट' कार्यक्रम, संलग्न महाविद्यालयांच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा चे मार्गदर्शन, माजी विद्यार्थ्यांचा सहभाग आणि उद्योग जगतासोबतच्या सामंजस्य करारांमध्ये वाढ करण्यात आली. संशोधन आणि विद्यार्थी विकासात सकारात्मक बदल या उपक्रमांमुळे विद्यापीठातील उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधील संशोधन प्रकाशनांत मोठी वाढ झाली आहे. याशिवाय पेटंट्सची संख्या, संशोधन फेलोची संख्या, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, उच्च शिक्षणातील प्रवेश, आणि क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीत कमालीची सुधारणा दिसून येत आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची ही कामगिरी जागतिक दर्जाच्या शैक्षणिक वाटचालीची महत्त्वपूर्ण पावती ठरली असून, भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी उच्च स्थान मिळवण्यासाठी संपूर्ण विद्यापीठ परिवाराला यामुळे मोठी प्रेरणा मिळाली आहे.



**हे यश विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, संशोधक, विद्यार्थी आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम आणि उद्योग सहकार्यावर अधिक भर देत अमरावती विद्यापीठाला जागतिक स्तरावर नवीन उंचीवर नेण्याचा आमचा संकल्प आहे.**

**- डॉ. मिलींद बारहाते**

कुलगुरू संगाबा अमरावती विद्यापिठ

### क्यूएस एशिया युनिव्हर्सिटी रँकिंग

क्यूएस एशिया युनिव्हर्सिटी रँकिंग (QS Asia University Rankings) क्वॉक्वारेली (किंवा क्वैक्ली) साइमंड्स (QS) या लंडन स्थित जागतिक उच्च शिक्षण संस्थे द्वारा दरवर्षी आशियातील सर्वोत्तम विद्यापीठे आणि उच्च शिक्षण संस्थांची सूची जाहीर करण्यात येते.

ही रँकिंग शैक्षणिक प्रतिष्ठा, पसंती, शिक्षक-विद्यार्थी प्रमाण आणि संशोधन यांसारख्या निकषांच्या आधारे ठरवली जाते.

मुख्य वैशिष्ट्ये आणि निकषस्थापना व उद्देश: आशियातील शैक्षणिक दर्जा सुधारणे आणि विद्यार्थ्यांना योग्य संस्था निवडण्यात मदत करणे हा यामागील उद्देश आहे.

मूल्यांकन निकष: यामध्ये शैक्षणिक प्रतिष्ठा (Academic Reputation), रोजगार क्षमता (Employer Reputation), फॅकल्टी-विद्यार्थी प्रमाण (Faculty-Student Ratio), आणि संशोधन पेपर प्रति उद्धरण (Citations per Paper) पाहिले जातात.

### आशियातील उच्च दर्जाप्राप्त विद्यापीठे:

प्रथम क्रमांक: हाँगकाँग विद्यापीठ,

द्वितीय क्रमांक: पेकिंग विद्यापीठ (चीन),

तृतीय क्रमांक: नॅशनल युनिव्हर्सिटी ऑफ सिंगापूर आणि नानयांग टेक्नोलॉजिकल युनिव्हर्सिटी (संयुक्त).

### यादीतील भारतातील अग्रगण्य संस्था:

आयआयटी दिल्ली: ५९ वा क्रमांक (भारतातील सर्वोच्च). एकूण भारतीय संस्था: २९४. पहिल्या १०० मध्ये ७ भारतीय संस्थांचा समावेश आहे.

# अमरावती विद्यापीठाची गरुडझेप

## 'क्यूएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंग'मध्ये मानाचे स्थान

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने जागतिक शैक्षणिक क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी नोंदवत प्रतिष्ठित 'क्यूएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६'मध्ये मानाचे स्थान मिळवले आहे. आशिया खंडातील विद्यापीठांमध्ये १००१ ते ११०० च्या गटात, तर दक्षिण आशियाई स्तरावर ३३० व्या क्रमांकावर अमरावती विद्यापीठाने बाजी मारली आहे. 'क्यूएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ इयरबुक'मध्ये या कामगिरीची अधिकृत नोंद घेण्यात आली असून, यामुळे विदर्भाच्या शैक्षणिक क्षेत्रात अभिमानास्पद भर पडली आहे.

कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या मार्गदर्शनात 'अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा'ने (आयक्यूएसी) राबवलेली धोरणे निर्णायक ठरली. संचालक डॉ. संदीप वाघुळे यांच्या देखरेखीखाली गुणवत्ता वाढीसाठी आणि संशोधन संस्कृतीला बळ देण्यासाठी विशेष उपक्रम हाती घेण्यात आले होते. प्रत्येक प्राध्यापकासाठी दरवर्षी किमान तीन दर्जेदार संशोधन निबंध प्रकाशित करणे अनिवार्य करण्यात आले. तसेच 'स्कोपस', 'वेब ऑफ सायन्स' आणि 'यूजीसी' मानकांनुसार संशोधनाचे मूल्यमापन सुरू झाले. त्यामुळे संशोधनाला गती मिळाली. परीक्षेचे निकाल वेळेत जाहीर करण्यावर भर देण्यात आला. याशिवाय 'करिअर अॅडव्हान्समेंट स्कीम' (सीएएस) आणि 'एपीआय' प्रमाणपत्र प्रक्रियेला गती देण्यात आली.

सर्व विभागांत मूल्यवर्धित अभ्यासक्रम वाढवण्यात आले. उद्योग जगतासोबत सामंजस्य करार, माजी विद्यार्थ्यांचा सहभाग आणि 'स्कूल कनेक्ट' यांसारख्या उपक्रमांमुळे शैक्षणिक व सामाजिक समन्वय साधला गेला.

या सर्व प्रयत्नांचा परिणाम म्हणून आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधील संशोधन प्रकाशने, पेटंट नोंदणी, संशोधन फेलोशिप्स आणि विद्यार्थ्यांच्या 'प्लेसमेंट'च्या प्रमाणात मोठी वाढ नोंदवण्यात आली आहे.

> हे यश विद्यापीठातील शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, संशोधक व विद्यार्थ्यांच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. संशोधन, नवोपक्रम आणि उद्योग सहकार्याच्या जोरावर अमरावती विद्यापीठाला जागतिक स्तरावर अधिक उंच नेण्याचा आमचा मानस आहे.
>
> **-डॉ. मिलिंद बारहाते, कुलगुरू,** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ

सकाळ

# अमरावती विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा

## क्यूएस आशिया युनिर्व्हसिटी रँकिंगमध्ये भरारी

**सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. ५ : जागतिक स्तरावरील अत्यंत प्रतिष्ठित मानाल्या जाणाऱ्या 'क्यूएस आशिया युनिर्व्हसिटी रँकिंग २०२६' मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी करीत दमदार झेप घेतली आहे. विद्यापीठाने आशिया खंडात १००१-११०० च्या बँडमध्ये, तर दक्षिण आशियात ३३० वा क्रमांक पटकावून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. 'क्यूएस वर्ल्ड युनिर्व्हसिटी रँकिंग २०२६ इयरबुक'मध्ये विद्यापीठाच्या या यशाची अधिकृत नोंद घेण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या या ऐतिहासिक यशामागे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे दूरदर्शी नेतृत्व, गुणवत्ताकेंद्रित धोरणे आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यांचा मोलाचा वाटा आहे. कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, नवोपक्रम, विद्यार्थी विकास आणि आंतरराष्ट्रीय निकषांची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी केली. अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी विविध उपक्रमांचा पाठपुरावा केला. गेल्या दोन वर्षांत अंतर्गत गुणवत्ता कक्षामार्फत विद्यापीठात महत्त्वाचे सकारात्मक बदल घडवून आणण्यात आलेत. प्रत्येक शिक्षकासाठी दरवर्षी किमान तीन दर्जेदार संशोधन निबंध प्रकाशित करण्याचे धोरण आखण्यात आले. स्कोपस, डब्ल्यूओएस आणि यूजीसीच्या निकषांनुसार संशोधनांतर्गत



> हे यश विद्यापीठातील सर्व शिक्षक, अधिकारी, कर्मचारी, संशोधक, विद्यार्थी आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या सामूहिक प्रयत्नांचे फळ आहे. गुणवत्ता, संशोधन, नवोपक्रम आणि उद्योग सहकार्यावर अधिक भर देत अमरावती विद्यापीठाला जागतिक स्तरावर नवीन उंचीवर नेण्याचा आमचा संकल्प आहे.
>
> **-डॉ. मिलिंद बारहाते,** कुलगुरू, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ.

परीक्षण सुरू करण्यात आले. सर्व विभागांमध्ये व्हॅल्यू अॅडेड (मूल्यवर्धित) कोर्सेसची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली. एपीआय प्रमाणपत्र प्रणाली आणि सीएएस (करिअर अॅडव्हान्समेंट स्कीम) प्रक्रियेला गती तसेच परीक्षेचे निकाल जाहीर करण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करण्यात आला. त्याचबरोबर स्कूल कनेक्ट कार्यक्रम, संलग्न महाविद्यालयांच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे मार्गदर्शन, माजी विद्यार्थ्यांचा सहभाग आणि उद्योग जगतासोबतच्या सामंजस्य करारांमध्ये वाढ करण्यात आली.

## अमरावती इव्हिनिंग

# विद्यापीठातील गृहविज्ञान विभागात स्तनपान जनजागृती सप्ताह उत्साहात साजरा



अमरावती दि. ७ :- विद्यार्थी हे उद्याचे पालक, कुटुंबाचे सदस्य, जागरूक नागरिक असून, आहार आणि आरोग्य याबाबत सर्वांप्रती सजग असायला हवे, यादृष्टीने १ ते ७ ऑगस्ट या जागतिक स्तनपान सप्ताह निमित्ताने 'ब्रोस्टफिडिंग फॉर सस्टेनेबल स्टार्टिंग लाईफ : स्ट्रेंथन व्हॉट वक्र्स' या थीम वर संत गाडगेबाबा विद्यापीठातील गृह विज्ञान विभागाच्या फुड सायन्स ॲन्ड न्युट्रिशन या पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांनी सप्ताहदरम्यान विविध पैलूंवर आधारित पोस्टर्सव्दारे स्तनपानविषयी जनजागृती केली.

विद्यार्थ्यांनी स्तनपानाच्या अनुषंगाने पोस्टर्सच्या माध्यमातून स्तनपान जनजागृतीचा संदेश प्रभावीपणे मांडला. तयार केलेल्या पोस्टर्समध्ये सुंदर हस्ताक्षर, आकर्षक चित्रे, प्रभावी घोषवाक्ये आणि माहितीपूर्ण संदेश यांचा कल्पकतेने वापर करण्यात आला. सदर पोस्टर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्तनपानाचे महत्त्व, आईच्या पहिल्या दुधाचे महत्त्व, दुध वाढविणारे पदार्थ, स्तनपान करण्याच्या पध्दती, फॉर्मुला मिल्क, मिल्क बँक, नवमातांनी स्तनपान करताना कोणत्या चुका टाळाव्यात, स्तनपानाबाबतचे गैरसमज दूर करणे, बॉटल फीडिंग, स्तनपान व मुदतपूर्व बाळ, वर्किंगमदर्स, मातांना कुटुंबाकडून मिळणारे सहकार्य आणि स्तनपानासाठी अनुकुल वातावरण यांसारख्या विविध बाबींव्दारे जनजागृती करण्यात आली. त्याचबरोबर मौखिक सादरीकरणाद्वारे जनजागृती केल्यामुळे हा उपक्रम केवळ पोस्टर निर्मितीपुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्य आणि सादरीकरणाच्या क्षमतेला चालना देणारा ठरला.

यावेळी गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांनी उपस्थितांना स्तनपानाबाबत मार्गदर्शन करतांना स्तनपानाचे बालकाच्या शारीरिक व मानसिक विकासातील महत्त्व, आई आणि बाळाच्या आरोग्यास होणारे फायदे, स्तनपानाबाबत योग्य माहिती, समाजातील गैरसमज दूर करणे याविषयी सविस्तर माहिती दिली. मातेला स्तनपान करताना कुटुबातील सदस्यांनी सुध्दा मातेला मानसिक व भावनिक आधार देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री सुमित गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली सत्र १ च्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपक्रमाच्या माध्यमातून जागरूक माता, निरोगी बालक, सुदृढ कुटुंब, निरोगी समाज असा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाला विभागातील रविशा आंबेकर, दिपाली भैसे, शिल्पा इंगोले, आयतल कामदार, अनुश्री आडे, शिक्षकेतर कर्मचारी श्री अशोक हिरे, श्री वसंत इंगळे, श्री चरणदास जामठे, विद्यार्थी उपस्थित होते.

## आपली मातृभूमि

# विद्यापीठातील गृहविज्ञान विभागात स्तनपान जनजागृती सप्ताह

**आमा प्रतिनिधी / ७ ऑगस्ट**

**अमरावती** – बाळाच्या निकोप वाढीसाठी आणि निरोगी समाजासाठी स्तनपानाचे महत्त्व घराघरांत पोहोचवण्याच्या उद्देशाने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठातील गृहविज्ञान विभागाच्या अन्नशास्त्र व पोषणशास्त्र पदव्युत्तर शाखेच्या विद्यार्थ्यांनी जागतिक स्तनपान सप्ताहाचे औचित्य साधून अनोखा जनजागृती उपक्रम राबवला. 'शाश्वत जीवनक्रमासाठी स्तनपान' या संकल्पनेवर आधारित १ ते ७ ऑगस्ट दरम्यान आयोजित या सप्ताहात विद्यार्थ्यांनी आपल्या कल्पकतेने तयार केलेल्या माहितीपूर्ण चित्रफलकांद्वारे आणि प्रभावी तोंडी सादरीकरणातून समाजाला मोलाचा संदेश दिला. या



उपक्रमात विद्यार्थ्यांनी अत्यंत सुंदर हस्ताक्षर, आकर्षक चित्रे आणि आशयघन बोधवाक्यांचा वापर करत आईच्या पहिल्या दुधाचे (चिकाचे) महत्त्व, दुग्धवर्धक नैसर्गिक अन्नपदार्थ, स्तनपानाच्या योग्य पद्धती, कृत्रिम दुधाचे दुष्परिणाम, दुधपेढीची माहिती आणि बाटलीने दूध पाजण्याचे धोके यावर सखोल प्रकाश टाकला. नोकरी करणाऱ्या मातांचे नियोजन, मुदतपूर्व जन्माला आलेल्या बाळांची काळजी, स्तनपानाबाबतचे गैरसमज दूर करणे आणि नवमातांना कुटुंबाकडून मिळणाऱ्या सहकार्याचे महत्त्व याविषयी अत्यंत सोप्या भाषेत संवाद साधण्यात आला. या जनजागृती कार्यक्रमात गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांनी बालकाच्या शारीरिक व मानसिक विकासात स्तनपानाचे स्थान अनन्यसाधारण असल्याचे सांगत कुटुंबाच्या सहभागावर भर दिला. प्राध्यापक सुमित गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली पहिल्या सत्रातील विद्यार्थ्यांनी या उपक्रमासाठी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाला रवीशंभा आंबेकर, दिपाली म्हैसे, शिल्पा इंगोले, आयतल कामदार, अनुश्री आडे यांच्यासह शिक्षकेतर कर्मचारी अशोक हिरे, वसंत इंगळे, चरणदास जामठे आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# क्यु. एस. आशिया युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये विद्यापीठाची उत्तुंग भरारी

**कुलगुरूंच्या मार्गदर्शनात मिळाले यश**

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी

**अमरावती** : जागतिक स्तरावरील क्यु. एस. आशिया युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ मध्ये संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी करत दमदार झेप घेतली आहे. विद्यापीठाने आशिया खंडात १००१-११०० च्या बँडमध्ये, तर दक्षिण आशियात ३३० वा क्रमांक पटकावून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. क्यु. एस. वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ इयरबुकमध्ये विद्यापीठाच्या या यशाची अधिकृत नोंद घेण्यात आली आहे. कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, नवोपक्रम, विद्यार्थी विकास आणि आंतरराष्ट्रीय निकषांची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी केली. अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी विविध उपक्रमांचा पाठपुरावा केला. गेल्या दोन वर्षात अंतर्गत गुणवत्ता कक्षामार्फत विद्यापीठात महत्त्वाचे सकारात्मक बदल घडवून आणण्यात आलेत. प्रत्येक शिक्षकासाठी दरवर्षी किमान तीन दर्जेदार संशोधन निबंध प्रकाशित करण्याचे धोरण आखण्यात आले.

स्कोपस, डब्ल्यूओएस आणि यूजीसीच्या निकषांनुसार संशोधनाचे अंतर्गत परीक्षण सुरू करण्यात आले. सर्व विभागांमध्ये व्हॅल्यू ॲडेड (मूल्यवर्धित) कोर्सेसची संख्या मोठ्याप्रमाणावर वाढविण्यात आली. एपीआय प्रमाणपत्र प्रणाली आणि सीएएस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) प्रक्रियेला गती तसेच परीक्षेचे निकाल जाहीर करण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करण्यात आला. त्याचबरोबर स्कूल कनेक्ट कार्यक्रम, संलग्न महाविद्यालयांच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे मार्गदर्शन, माजी विद्यार्थ्यांचा सहभाग आणि उद्योग जगतासोबतच्या सामंजस्य करारांमध्ये वाढ करण्यात आली. संशोधन आणि विद्यार्थी विकासात सकारात्मक बदल या उपक्रमांमुळे विद्यापीठातील उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधील संशोधन प्रकाशनांत मोठी वाढ झाली आहे. याशिवाय पेटंट्सची संख्या, संशोधन फेलोची संख्या, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, उच्च शिक्षणातील प्रवेश, आणि क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीत कमालीची सुधारणा दिसून येत आहे.

मराठी दैनिक
**वृत्त केसरी**

क्यु.एस. आशिया युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये

# संगाबा अमरावती विद्यापीठाची उत्तुंग भरारी

प्रतिनिधी / वृत्त केसरी

**अमरावती, ७ ऑगस्ट** - जागतिक स्तरावरील अत्यंत प्रतिष्ठितमानाच्या 'क्युएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६' मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी करत दमदार झेप घेतली आहे. विद्यापीठाने आशिया खंडात १००१-११०० च्या बँडमध्ये, तर दक्षिण आशियात ३३० वा क्रमांक पटकावून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. 'क्युएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ इयरबुक'मध्ये विद्यापीठाच्या या यशाची अधिकृत नोंद घेण्यात आली आहे.

विद्यापीठाच्या या ऐतिहासिक यशामागे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचे दूरदर्शी नेतृत्व, गुणवत्ताकेंद्रित धोरणे आणि विकासाभिमुख दृष्टिकोन यांचा मोलाचा वाटा आहे. कुलगुरूंच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, नवोपक्रम, विद्यार्थी विकास आणि आंतरराष्ट्रीय निकषांची अतिशय प्रभावीपणे अंमलबजावणी केली. अंतर्गत गुणवत्ता कक्षा चे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी विविध उपक्रमांचा पाठपुरावा केला.

गेल्या दोन वर्षात अंतर्गत गुणवत्ता कक्षामार्फत विद्यापीठात महत्त्वाचे सकारात्मक बदल घडवून आणण्यात आलेत. प्रत्येक शिक्षकासाठी दरवर्षी किमान तीन दर्जेदार संशोधन निबंध प्रकाशित करण्याचे धोरण आखण्यात आले. स्कोपस,






डब्ल्यूओएस आणि यूजीसी च्या निकषांनुसार संशोधनाचे अंतर्गत परीक्षण सुरू करण्यात आले. सर्व विभागांमध्ये व्हॅल्यू ॲडेड (मूल्यवर्धित) कोर्सेसची संख्या मोठ्या प्रमाणावर वाढवण्यात आली. एपीआय प्रमाणपत्रप्रणाली आणि सीएएस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) प्रक्रियेला गती तसेच परीक्षेचे निकाल जाहीर करण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करण्यात आला. त्याचबरोबर 'स्कुल कनेक्ट' कार्यक्रम, संलग्न महाविद्यालयांच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षा चे मार्गदर्शन, माजी विद्यार्थ्यांचा सहभाग आणि उद्योग जगतासोबतच्या सामंजस्य करारांमध्ये वाढ करण्यात आली. संशोधन आणि विद्यार्थी विकासात सकारात्मक बदल या उपक्रमांमुळे विद्यापीठातील उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधील संशोधन प्रकाशनांत मोठी वाढ झाली आहे. याशिवाय पेटंट्सची संख्या, संशोधन फेलोची संख्या, विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, उच्च शिक्षणातील प्रवेश, आणि क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीत कमालीची सुधारणा दिसून येत आहे.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाची ही कामगिरी जागतिक दर्जाच्या शैक्षणिक वाटचालीची महत्त्वपूर्ण पावती ठरली असून, भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर आणखी उच्च स्थान मिळवण्यासाठी संपूर्ण विद्यापीठ परिवाराला यामुळे मोठी प्रेरणा मिळाली आहे.

पुरोगामी राष्ट्रीय विचारांचे दैनिक
**हिंदुस्थान**

# अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा प्रकाश पसरवणे हीच खरी राष्ट्रसेवा : कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते

## विद्यापीठात ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

अमरावती दि. १६ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक विकासामध्ये दिलेले योगदान उल्लेखनीय असून सर्व शिक्षक व विद्यार्थी या योगदानामधील सातत्य कायम ठेवतील. अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा व कौशल्याचा प्रकाश पसरवणे हीच आपली खरी राष्ट्रसेवा असेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले. विद्यापीठात ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी ध्वजारोहण केले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत व श्री राजेश पिदडी आदी उपस्थित होते.

ध्वजारोहणप्रसंगी उपस्थितांना संबोधित करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, वीर हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले, त्यांच्या त्यागाचे स्मरण करण्याचा आणि त्यांच्या चरणी नम्र कृतज्ञता व्यक्त करण्याचा आजचा हा दिवस आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे आणि राष्ट्र उभारणीचे सर्वात मोठे साधन आहे. संत गाडगे बाबा यांच्या नावाने ओळखल्या जाणाया आपल्या विद्यापीठाने नेहमीच ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक बांधीलकीचा वारसा पुढे चालवला आहे. विद्यापीठाने प्रतिष्ठित क्युएस रँकिंगमध्ये मानाचे स्थान मिळवले असून एशियन युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये १००१-११०० बँडमध्ये आणि दक्षिण आशियामध्ये ३३० वा क्रमांक पटकावला आहे. हे यश आपल्या सर्वांच्या प्रचंड मेहनतीचे फलित आहे.



विद्यापीठाने ए.आय. सह नवीन अभ्यासक्रम सुरू केले आहेत, त्याचा निश्चितच विद्याथ्र्यांना फायदा होणार आहे. विद्यापीठ व महाविद्यालयातील अनेक विद्याथ्र्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. अनेकांना स्टार्टअप साठी फंड सुद्धा दिला गेला आहे. त्यामुळे अधिकाधिक स्टार्टअप भविष्यात तयार करण्यासाठी चालना मिळणार आहे.

आंतरराष्ट्रीय परिषदेत कु. रुबिना चांद शेख आणि डॉ. अनिता पाटील व कु. अनघा मोरोपंत उंदिरवाडे यांनी मिळविलेले यश उल्लेखनीय आहे. विद्यापीठाचे विद्यार्थी, खेळाडू, कलावंत, कलाकार, संशोधक यांनी विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये भर घातली आहे. आंतर विद्यापीठ आणि अखिल भारतीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, संशोधन स्पर्धा आणि इतरही स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या विद्याथ्र्यांनी दर्जेदार व नेत्रदीपक कामगिरी करुन पदके व पारितोषिके मिळवली आहेत. विद्यापीठाच्या प्रशासकीय व शैक्षणिक विकासामध्ये विशेषतः भौतिक विकास यामध्ये सुद्धा विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचायांचे फार मोठे योगदान आहे.

विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व विद्यार्थी, कलावंत, खेळाडू, संशोधक यांनी अधिकाधिक प्रयत्न करुन आपल्या कामगिरीमध्ये अधिक वाढ करावी आणि विद्यापीठाचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने पोहोचविण्याकरीता प्रयत्न करावा. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय परिसंवादामध्ये सादर केलेल्या प्रकल्पधारीत संशोधन पत्र, पेटेन्ट, महत्वपूर्ण सामाजिक विषय आणि नाविन्यपूर्ण शोध किंवा योगदान, यासाठी युजी, पीजी आणि पीएच.डी. च्या संशोधक विद्याथ्र्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी कुलगुरू फेलोशीप सुरु करण्यात आली असून त्याचा विद्याथ्र्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरूंनी याप्रसंगी केले.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्याग व बलीदान देणाया सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करुन कुलगुरूंनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. संचालन पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी केले. स्वातंत्र्य दिन कार्यक्रमाला विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सकाळ



**अमरावती** : विचार मांडताना कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते. कार्यक्रमाला उपस्थित अधिकारी व कर्मचारी.

# ज्ञानाचा प्रकाश पसरवणे हीच खरी राष्ट्रसेवा

## कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते : विद्यापीठात स्वातंत्र्यदिन उत्साहात

**सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. १६ : संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक विकासामध्ये दिलेले योगदान उल्लेखनीय असून सर्व शिक्षक व विद्यार्थी, या योगदानामधील सातत्य कायम ठेवतील. अज्ञानाचा अंधार दूर करून ज्ञानाचा व कौशल्याचा प्रकाश पसरवणे हीच आपली खरी राष्ट्रसेवा असेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले.

विद्यापीठात स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी ध्वजारोहण केले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत व राजेश पिदडी उपस्थित होते.

विद्यापीठाने प्रतिष्ठित क्यूएस रँकिंगमध्ये मानाचे स्थान मिळवले असून एशियन युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये १००१-११०० बँडमध्ये आणि दक्षिण आशियामध्ये ३३० वा क्रमांक पटकावला आहे. हे यश आपल्या सर्वांच्या प्रचंड मेहनतीचे फलित असल्याचे कुलगुरू म्हणाले.

तसेच नावीन्यपूर्ण उपक्रम, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय परिसंवादामध्ये सादर केलेल्या प्रकल्पधारित संशोधन पत्र, पेटेंट, महत्त्वपूर्ण सामाजिक विषय आणि नावीन्यपूर्ण शोध किंवा योगदान, यासाठी यूजी, पीजी व पीएच.डी. च्या संशोधक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी कुलगुरू फेलोशीप सुरू करण्यात आली असून त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरूंनी याप्रसंगी केले.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्याग व बलिदान देणाऱ्या सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करून कुलगुरूंनी सर्वांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्यात. संचालन डॉ. तनुजा राऊत यांनी केले. स्वातंत्र्यदिन कार्यक्रमाला विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# राष्ट्रसंतांचे विचार कृतीत आणा

**डॉ. सतीश तराळ यांचे प्रतिपादन**

**विद्यापीठाच्या वतीने ग्रामगीता व्याख्यानमाला**

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**अमरावती** : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केवळ विचार दिले नाही, तर त्यांनी समाजातील असलेली व्यसने, अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्र्य हे प्रत्यक्ष अनुभवले आणि त्यानंतरच त्यांनी उपदेश केला. ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील त्यांनी सांगितलेले आचारप्राबल्य जोपर्यंत आपण प्रत्यक्ष कृतीत आणणार नाही, तोपर्यंत त्याची पूर्तता होणार नाही. म्हणून राष्ट्रसंतांचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणा, असे प्रतिपादन साहित्यिक डॉ. सतीश तराळ यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या वतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून जनसंपर्क विभाग व वायडीव्हीडी कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने तिवसा येथे आयोजित ग्रामगीता व्याख्यानमालाप्रसंगी 'ग्रामगीतेतील लोकवशिकरण पंचकातील आचार प्राबल्य' या विषयावर व्याख्यान देताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, तर प्रमुख अतिथी म्हणून प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती तथा वनराईचे अध्यक्ष मधू घारड, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे आचार्य हरिभाऊ विरुळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच. आर. देशमुख, संत गाडगेबाबा अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर उपस्थित होते.

यावेळी मधू घारड, हरिभाऊ विरुळकर, डॉ. महेंद्र ढोरे यांनीही आपले विचार व्यक्त केले. संत गाडगेबाबा, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, शामरावदादा मोकदम व यादवराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीत व संस्थागीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी शामरावदादा मोकदम यांच्यावरील पुस्तकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदूरकर, संचालन प्रा. विनोद खडसे, तर आभार प्रदर्शन ग्रंथपाल प्रा. रवींद्र पाटील यांनी केले.

हिंदुस्थान

# स्वातंत्र्य दिनी विद्यापीठात अमृत - एसआरआयएफ योजनेचा शुभारंभ

## विद्यार्थी, नवउद्योजकांना स्टार्टअप, नवकला, उद्योजकतेसाठी मिळणार नवी दिशा




अमरावती दि. १७ : स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन आणि अमृत यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणा-या 'अमृत - एसआरआयएफ' योजनेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या योजनेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व अमृतचे व्यवस्थापकीय संचालक श्री विजय जोशी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. विद्यापीठातील विद्यार्थी, नवउद्योजक आणि स्टार्टअप्सना उद्योग व व्यवसाय क्षेत्रासाठी आवश्यक मार्गदर्शन, इन्क्युबेशन सुविधा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि उद्योजकता विकासासाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही योजना महत्वपूर्ण ठरणार आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री आनंद यादव, व्यवस्थापक श्री अमोल हिरुळकर यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे संचालक, अधिकारी व मान्यवर तसेच अमृतचे अमरावती विभागीय व्यवस्थापक श्री प्रवीण कोळेश्वर, जिल्हा व्यवस्थापक श्री ऋषिकेश कथलकर प्रामुख्याने उपस्थित होते.

'अमृत - एसआरआयएफ' योजनेच्या माध्यमातून पात्र विद्यार्थी व नवउद्योजकांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यावसायिक स्वरुप देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध होणार आहे. नवकल्पना विकसित करणे, स्टार्टअप उभारणी, व्यवसाय मॉडेल तयार करणे, बाजारपेठेची समज विकसित करणे, तज्ज्ञ मार्गदर्शन व मेंटॉरिंग तसेच इन्क्युबेशनच्या माध्यमातून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर या योजनेत भर राहणार आहे. एसजीबीएयू रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन (एसआरआयएफ) हे विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधक आणि नवउद्योजकांच्या अभिनव कल्पनांना स्टार्टअप व उद्योगांमध्ये रुपांतरित करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. अमृतच्या सहकार्याने सुरू झालेल्या या योजनेमुळे उद्योजकतेकडे वळू इच्छिणा-या युवकांना विद्यापीठाच्या इन्क्युबेशन इकोसिस्टमचा लाभ मिळणार असून, त्यांच्या कल्पनांना प्रत्यक्ष व्यवसायामध्ये रुपांतरित करण्यासाठी आवश्यक पाठबळ उपलब्ध होणार आहे. या योजनेमुळे 'नवकल्पनेतून उद्योजकता आणि उद्योजकतेतून रोजगारनिर्मिती' या संकल्पनेला चालना मिळणार आहे. विद्यापीठ, अमृत आणि एसआरआयएफ यांच्या समन्वयातून सुरू झालेली ही योजना अमरावतीसह विदर्भातील स्टार्टअप व उद्योजकता परिसंस्था अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इन्क्युबेशन सेंटरच्या टीममधील श्री नरेश मोवाळे, श्री रवी ढेंगळे, श्री रणधीर घाटे, श्री आदित्य किल्लेवाले आदींनी विशेष परिश्रम घेतले.

पुण्य नगरी

# अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा प्रकाश पसरविणे हीच खरी राष्ट्रसेवा

**कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे प्रतिपादन**

**विद्यापीठात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा**



**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक विकासामध्ये दिलेले योगदान उल्लेखनीय असून सर्व शिक्षक व विद्यार्थी या योगदानामधील सातत्य कायम ठेवतील. अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा व कौशल्याचा प्रकाश पसरविणे हीच आपली खरी राष्ट्रसेवा असेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले.

विद्यापीठात स्वातंत्र्यदिन उत्साहात साजरा करण्यात आला. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी ध्वजारोहण केले. त्याप्रसंगी मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाला प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत व राजेश पिदडी आदी उपस्थित होते. भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्याग व बलिदान देणाया सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे कुलगुरुंनी स्मरण केले. कार्यक्रमाचे संचालन पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी केले. कार्यक्रमाला विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विदर्भ मतदार

## स्वातंत्र्यदिनी विद्यापीठात अमृत–एसआरआयएफ योजनेचा शुभारंभ

**विद्यार्थी व नवउद्योजकांना स्टार्टअप, नवकल्पना, उद्योजकतेसाठी मिळणार नवी दिशा**



**अमरावती (प्रतिनिधी) दि. १७ :** स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन आणि अमृत यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'अमृत - एसआरआयएफ' योजनेचा शुभारंभ उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आला. या योजनेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांच्या शुभहस्ते करण्यात आले.

विद्यापीठातील विद्यार्थी, नवउद्योजक आणि स्टार्टअप्सना उद्योग व व्यवसाय क्षेत्रांसाठी आवश्यक मार्गदर्शन, इन्क्युबेशन सुविधा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि उद्योजकता विकासासाठी आवश्यक सहाय्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरूळकर यांच्यासह विद्यापीठातील विविध विभागांचे संचालक, अधिकारी व मान्यवर तसेच अमृतचे अमरावती विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर, जिल्हा व्यवस्थापक ऋषिकेश कथलकर प्रामुख्याने उपस्थित होते.

'अमृत - एसआरआयएफ' योजनेच्या माध्यमातून पात्र विद्यार्थी व नवउद्योजकांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यावसायिक स्वरुप देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध होणार आहे. नवकल्पना विकसित करणे, स्टार्टअप उभारणी, व्यवसाय मॉडेल तयार करणे, बाजारपेठेची समज विकसित करणे, तज्ज्ञ मार्गदर्शन व मेंटॉरिंग तसेच इन्क्युबेशनच्या माध्यमातून आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर या योजनेत भर राहणार आहे. एसजीबीएयू रिसर्च अँन्ड इन्क्युबेशन फाऊंडेशन (एसआरआयएफ) हे विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधक आणि नवउद्योजकांच्या अभिनव कल्पनांना स्टार्टअप व उद्योगांमध्ये रुपांतरित करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे.

अमृतच्या सहकार्याने सुरू झालेल्या या योजनेमुळे उद्योजकतेकडे वळू इच्छिणा-या युवकांना विद्यापीठाच्या इन्क्युबेशन इकोसिस्टमचा लाभ मिळणार असून, त्यांच्या कल्पनांना प्रत्यक्ष व्यवसायामध्ये रुपांतरित करण्यासाठी आवश्यक पाठबळ उपलब्ध होणार आहे.

या योजनेमुळे 'नवकल्पनेतून उद्योजकता आणि उद्योजकतेतून रोजगारनिर्मिती' या संकल्पनेला चालना मिळणार आहे. विद्यापीठ, अमृत आणि एसआरआयएफ यांच्या समन्वयातून सुरू झालेली ही योजना अमरावतीसह विदर्भातील स्टार्टअप व उद्योजकता परिसंस्था अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इन्क्युबेशन सेंटरच्या टीममधील नरेश मोवाळे, रवी ढेंगळे, रणधीर घाटे, आदित्य किल्लेवाले आदींनी विशेष परिश्रम घेतले.

अमरावती मंडल

## संगाबा विद्यापीठ में क्रांतिसिंह नाना पाटिल की जयंती मनाई



**अमरावती** - संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ में स्वतंत्रता सेनानी क्रांतिसिंह नाना पाटिल की जयंती मनाई सोमवार ३ अगस्त को मनाई गई. इस अवसर पर कुलसचिव डॉ. अविनाश असनारे ने क्रांतिसिंह नाना पाटिल की प्रतिमा का पूजन कर पुष्पमाला अर्पित की और विद्यापीठ की ओर से अभिवादन किया. इस समय उपकुलसचिव (आस्थापना) मंगेश वरखेडे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर तथा विद्यापीठ के अधिकारी, कर्मचारी उपस्थित थे. कार्यक्रम का संचालन एवं क्रांतिसिंह नाना पाटिल के जीवनकार्यों की जानकारी सूचना व जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर ने दी.

लोकमत

# अमरावती विद्यापीठाची 'क्यूएस आशिया रँकिंग'मध्ये दमदार झेप

## आशिया खंडात विद्यापीठांच्या १००१-११०० बँडमध्ये स्थान

लोकमत न्यूज नेटवर्क



**अमरावती :** जागतिक स्तरावरील प्रतिष्ठित 'क्यूएस आशिया युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६'मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने उल्लेखनीय कामगिरी नोंदविली आहे. विद्यापीठाने आशिया खंडात १००१-११०० च्या बँडमध्ये, तर दक्षिण आशियात ३३० वा क्रमांक पटकावून विदर्भासह संपूर्ण महाराष्ट्राच्या शैक्षणिक शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

'क्युएस वर्ल्ड युनिव्हर्सिटी रँकिंग २०२६ इयरबुक'मध्ये विद्यापीठाच्या या यशाची अधिकृत नोंद घेण्यात आली आहे. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाच्या अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाने (आयक्यूएसी) शैक्षणिक गुणवत्ता, संशोधन संस्कृती, नवोपक्रम, विद्यार्थी विकास आणि आंतरराष्ट्रीय निकषांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. अंतर्गत गुणवत्ता कक्षाचे संचालक डॉ. संदीप वाघुळे यांनी विविध उपक्रमांचा सातत्यपूर्ण पाठपुरावा केल्याने हे यश सुकर झाले.

## असे घडले सकारात्मक बदल

गेल्या दोन वर्षांत अंतर्गत गुणवत्ता कक्षामार्फत विद्यापीठात महत्त्वाचे सकारात्मक बदल घडवून आणण्यात आले. प्रत्येक शिक्षकासाठी दरवर्षी किमान तीन दर्जेदार संशोधन निबंध प्रकाशित करण्याचे धोरण आखण्यात आले. स्कोपस, डब्ल्यूओएस आणि यूजीसीच्या निकषांनुसार संशोधनाचे अंतर्गत परीक्षण करण्यात आले. यामुळे उच्च दर्जाच्या आंतरराष्ट्रीय नियतकालिकांमधील संशोधन प्रकाशनांत मोठी वाढ झाली आहे.

## या निकषांवर मिळाली यशाची पावती

मूल्यवर्धित कोर्सेस : सर्व विभागांमध्ये मूल्यवर्धित कोर्सेसची संख्या वाढवण्यात आली.

**प्रशासकीय गती : एपीआय प्रमाणपत्र प्रणाली आणि सीएएस (करिअर ॲडव्हान्समेंट स्कीम) प्रक्रियेला गती देण्यात आली.**

वेगवान निकाल : परीक्षांचे निकाल जाहीर करण्याचा कालावधी लक्षणीयरीत्या कमी करण्यात आला.

**संशोधनाला बळ : पेटंट्स आणि संशोधन फेलोच्या संख्येत कमालीची सुधारणा झाली.**

प्लेसमेंट व क्रीडा : विद्यार्थ्यांचे प्लेसमेंट, उच्च शिक्षणातील प्रवेश आणि क्रीडा व सांस्कृतिक क्षेत्रातील कामगिरीत मोठी वाढ झाली.

> क्यूएस आशिया रँकिंगमधील हे ऐतिहासिक यश म्हणजे विद्यापीठातील प्रत्येक घटकाच्या कष्टाची पावती आहे. आगामी काळात जागतिक निकषांवर आधारित संशोधन आणि उद्योग सहकार्याला अधिक गती देऊन विद्यापीठाचा दर्जा आणखी उंचावण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> **डॉ. मिलिंद बारहाते,** कुलगुरू

मराठी दैनिक
वृत्त केसरी
नवा संकल्प नवी दृष्टी

अज्ञानाचा अंधार दूर करुन

# ज्ञानाचा प्रकाश पसरवणे हीच खरी राष्ट्रसेवा



कुलगुरू डॉ. बारहाते यांचे प्रतिपादन

विद्यापीठात स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा

प्रतिनिधी / वृत्त केसरी

अमरावती , १६ ऑगस्ट: संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक विकासामध्ये दिलेले योगदान उल्लेखनीय असून सर्व शिक्षक व विद्यार्थी या योगदानामधील सातत्य कायम ठेवतील. अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा व कौशल्याचा प्रकाश पसरवणे हीच आपली खरी राष्ट्रसेवा असेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी केले.

विद्यापीठात 80 वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी ध्वजारोहण केले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत व राजेश पिदडी आदी उपस्थित होते. ध्वजारोहणप्रसंगी उपस्थितांना संबोधित करतांना कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते म्हणाले, वीर हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले, त्यांच्या त्यागाचे स्मरण करण्याचा आणि त्यांच्या चरणी नम्र कृतज्ञता व्यक्त करण्याचा आजचा हा दिवस आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे आणि राष्ट्र उभारणीचे सर्वात मोठे साधन आहे. संत गाडगे बाबा यांच्या नावाने ओळखल्या जाणाऱ्या आपल्या विद्यापीठाने नेहमीच ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक बांधीलकीचा वारसा पुढे चालवला आहे. विद्यापीठाने प्रतिष्ठित क्युएस रँकिंगमध्ये मानाचे स्थान मिळवले असून एशियन युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये 1001-1100 बँडमध्ये आणि दक्षिण आशियामध्ये 330 वा क्रमांक पटकावला आहे. हे यश आपल्या सर्वांच्या प्रचंड मेहनतीचे फलित आहे.

आंतरराष्ट्रीय परिषदेत कु. रुबिना चांद शेख आणि डॉ. अनिता पाटील व कु. अनघा मोरोपंत उदिरवाडे यांनी मिळविलेले यश उल्लेखनीय आहे. विद्यापीठाचे विद्यार्थी, खेळाडू, कलावंत, कलाकार, संशोधक यांनी विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये भर घातली आहे. आंतर विद्यापीठ आणि अखिल भारतीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, संशोधन स्पर्धा आणि इतरही स्पर्धांमध्ये



विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दर्जेदार व नेत्रदीपक कामगिरी करुन पदके व पारितोषिके मिळवली आहेत. विद्यापीठाच्या प्रशासकीय व शैक्षणिक विकासामध्ये विशेषत: भौतिक विकास यामध्ये सुद्धा विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचे मोठे योगदान आहे. विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व विद्यार्थी, कलावंत, खेळाडू, संशोधक यांनी अधिकाधिक प्रयत्न करुन आपल्या कामगिरीमध्ये अधिक वाढ करावी आणि विद्यापीठाचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने पोहोचविण्याकरीता प्रयत्न करावा. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय परिसंवादामध्ये सादर केलेल्या प्रकल्पधारीत संशोधन पत्र, पेटेन्ट, महत्वपूर्ण सामाजिक विषय आणि नाविन्यपूर्ण शोध किंवा योगदान, यासाठी युजी, पीजी आणि पीएच.डी. च्या संशोधक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी कुलगुरू फेलोशीप सुरु करण्यात आली असून त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरूंनी याप्रसंगी केले. संचालन पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी केले. स्वातंत्र्य दिन कार्यक्रमाला विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी; कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

हिंदुस्थान

# विद्यापीठातील गृहविज्ञान विभागात स्तनपान जनजागृती सप्ताह उत्साहात साजरा



अमरावती दि. ७ : विद्यार्थी हे उद्याचे पालक, कुटुंबाचे सदस्य, जागरूक नागरिक असून, आहार आणि आरोग्य याबाबत सर्वांप्रती सजग असायला हवे, याद्दष्टीने १ ते ७ ऑगस्ट या जागतिक स्तनपान सप्ताह निमित्ताने 'ब्रेस्टफिडिंग फॉर सस्टेनेबल स्टार्टिंग लाईफ : स्ट्रेंथन व्हॉट वर्क्स' या थीम वर संत गाडगेबाबा विद्यापीठातील गृह विज्ञान विभागाच्या फुड सायन्स अँन्ड न्युट्रिशन या पदव्युत्तर पदवीच्या विद्यार्थ्यांनी सप्ताहदरम्यान विविध पैलूंवर आधारित पोस्टर्सद्वारे स्तनपानविषयी जनजागृती केली.

विद्यार्थ्यांनी स्तनपानाच्या अनुषंगाने पोस्टर्सच्या माध्यमातून स्तनपान जनजागृतीचा संदेश प्रभावीपणे मांडला. तयार केलेल्या पोस्टर्समध्ये सुंदर हस्ताक्षर, आकर्षक चित्रे, प्रभावी घोषवाक्ये आणि माहितीपूर्ण संदेश यांचा कल्पकतेने वापर करण्यात आला. सदर पोस्टर्सच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी स्तनपानाचे महत्व, आईच्या पहिल्या दुधाचे महत्व, दुध वाढविणारे पदार्थ, स्तनपान करण्याच्या पध्दती, फॉर्मुला मिल्क, मिल्क बँक, नवमातांनी स्तनपान करताना कोणत्या चुका टाळाव्यात, स्तनपानाबाबतचे गैरसमज दूर करणे, बॉटल फीडींग, वर्किंगमदर्स, मातांना कुटुंबाकडून मिळणारे सहकार्य आणि स्तनपानासाठी अनुकुल वातावरण यांसारख्या विविध बाबींव्दारे जनजागृती करण्यात आली. त्याचबरोबर मौखिक सादरीकरणाद्वारे जनजागृती केल्यामुळे हा उपक्रम केवळ पोस्टर निर्मितीपुरता मर्यादित न राहता विद्यार्थ्यांच्या संवाद कौशल्य आणि सादरीकरणाच्या क्षमतेला चालना देणारा ठरला.

यावेळी गृहविज्ञान विभागप्रमुख डॉ. वैशाली धनविजय यांनी उपस्थितांना स्तनपानाबाबत मार्गदर्शन करतांना स्तनपानाचे बालकाच्या शारीरिक व मानसिक विकासातील महत्व, आई आणि बाळाच्या आरोग्यास होणारे फायदे, स्तनपानाबाबत योग्य माहिती, समाजातील गैरसमज दूर करणे याविषयी सविस्तर माहिती दिली. मातेला स्तनपान करताना कुटुंबातील सदस्यांनी सुध्दा मातेला मानसिक व भावनिक आधार देणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

उपक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्री सुमित गेडाम यांच्या मार्गदर्शनाखाली सत्र १ च्या विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. उपक्रमाच्या माध्यमातून जागरूक माता, निरोगी बालक, सुदृढ कुटुंब, निरोगी समाज असा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. कार्यक्रमाला विभागातील रश्मिा आंबेकर, दिपाली भैसे, शिल्पा झोले, आयतल कामदार, अनुश्री आडे, शिक्षकेतर कर्मचारी श्री अशोक हिरे, श्री वसंत इंगळे, श्री चरणदास जामदे, विद्यार्थी उपस्थित होते.

विदर्भ मतदार

# उच्च शिक्षणाला एआयची जोड; अमरावती विद्यापीठाचा पुढाकार

नमस्कार अमरावती

अमरावती (प्रतिनिधी) दि. १७ : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने पदवी शिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्तेला स्थान देत महत्वपूर्ण निर्णय घेतला आहे. विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांतील पदवी अभ्यासक्रमाच्या पाचव्या सत्रात फाऊंडेशन ऑफ आर्टिफिशिअल इंटेलिजन्स हा विषय अनिवार्य करण्यात आला आहे. असा निर्णय घेणारे अमरावती विद्यापीठ महाराष्ट्रातील पहिले विद्यापीठ ठरले आहे. सर्व प्रमुख विद्याशाखांतील विद्यार्थ्यांना हा विषय शिकावा लागणार आहे. या अभ्यासक्रमातून विद्यार्थ्यांना एआयची मूलभूत संकल्पना, तंत्रज्ञानाचा वापर याचे महत्व समजण्यास मदत होणार आहे. या विषयाची परीक्षा महाविद्यालयीन स्तरावर घेतली जाईल. संबंधित गुण व ग्रेड विद्यापीठाकडे पाठवून अंतिम गुणपत्रिकेत त्यांचा समावेश केला जाणार आहे. उच्च शिक्षणाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देणाऱ्या या निर्णयाचे स्वागत होत आहे. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी उपक्रमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे आवाहन केले आहे.

# कौशल्य आत्मसात करा,रोजगार निश्चित मिळेल-किरण पातुरकर

विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

अमरावती/ का.प्र.

पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिलेली नाही. त्यामुळेच केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकास, आत्मनिर्भर भारत यांसारख्या संकल्पनांना प्रत्यक्षात उतरवून विद्यार्थ्यांना रोजगाराभिमुख शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करावे, रोजगार निश्चित मिळेल, असे आवाहन अमरावती इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष तथा अमरावती विभागीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष श्री किरण पातुरकर यांनी विद्यार्थ्यांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील स्वामी विवेकानंद भवन येथे आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावतीचे उपायुक्त द.ल. ठाकरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावतीच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, अमरावती जिल्हा रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष भूषण काळमेघ, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

किरण पातुरकर म्हणाले, अमरावतीच्या तरुणांना अमरावतीतच रोजगार मिळाला पाहिजे. टेक्स्टाईल पार्क, आय.टी. पार्क येत्या काही वर्षात पूर्ण होईल, त्यामुळे स्थानिकांना त्यात मोठ्या प्रमाणात रोजगारही मिळेल. स्वयंसिध्दा च्या माध्यमातून आम्ही अनेकांना स्वत:च्या पायावर उभे केले आहे, असेही ते म्हणाले. याप्रसंगी विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी आलेल्या संधीचा लाभ घ्या, कौशल्य आत्मसात करा, असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. विद्यापीठाचे इन्क्युबेशन सेंटर देखील तुमच्या मदतीला आहे, त्याचा लाभ घ्या, असे सांगून त्यांनी विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास विभागाचे आयोजनासाठी अभिनंदन केले. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने उद्घाटन कार्यक्रमाची



सुरुवात झाली. प्रास्ताविकेतून श्री द.ल. ठाकरे यांनी रोजगार मेळाव्यामागील भूमिका स्पष्ट केली. याप्रसंगी रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी झालेल्या उद्योजकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मुलाखतीनंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन श्री बाबासाहेब मुगले यांनी, तर आभार विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी मानले. विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

**प्रतिदिन अखबार**



# कौशल हासिल करें, रोजगार निश्चित मिलेगा : किरण पातुरकर

## विश्वविद्यालय में पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेले को उत्स्फूर्त प्रतिसाद

**प्रतिनिधि/प्रतिदिन अखबार**

**अमरावती, 18 अगस्त-** इंडस्ट्रियल एसोसिएशन के अध्यक्ष एवं संभागीय रोजगार मेला समिति के अध्यक्ष किरण पातुरकर ने विद्यार्थियों से कौशल विकास पर जोर देते हुए कहा कि बदलते समय में रोजगार के लिए कौशल आवश्यक है.

केंद्र एवं राज्य सरकार रोजगारोन्मुख शिक्षा को बढ़ावा दे रही हैं, इसलिए विद्यार्थी कौशल हासिल करें, रोजगार निश्चित मिलेगा.

संत गाडगे बाबा अमरावती विश्वविद्यालय के स्वामी विवेकानंद भवन में आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेले के उद्घाटन अवसर पर वे बोल रहे थे. प्र-कुलगुरु डॉ. महेंद्र ढोरे ने विद्यार्थियों से उपलब्ध अवसरों का लाभ उठाने और विश्वविद्यालय के इन्क्युबेशन सेंटर का उपयोग करने का आह्वान किया. पातुरकर ने कहा कि अमरावती के युवाओं को स्थानीय स्तर पर रोजगार उपलब्ध कराने के प्रयास जारी हैं. टेक्सटाइल पार्क और आईटी पार्क शुरू होने के बाद स्थानीय युवाओं को रोजगार के अवसर मिलेंगे. कार्यक्रम में उद्यमियों का सत्कार किया गया तथा चयनित विद्यार्थियों को ऑफर लेटर प्रदान किए गए. कार्यक्रम में बड़ी संख्या में विद्यार्थी उपस्थित रहे.

**दैनिक दिव्य मराठी**

# विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभागात जागतिक हत्ती दिनानिमित्त माहितीपट



जागतिक हत्ती दिनानिमित्त चित्रफित दाखवण्यात आली.

**प्रतिनिधी | अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील प्राणिशास्त्र विभाग व इंडियन नॅशनल ट्रस्ट फॉर आर्ट अॅन्ड कल्चरल हेरीटेज संस्था (इंटक) अमरावती अध्याय यांच्या संयुक्त विद्यमाने जागतिक हत्ती दिवस प्राणिशास्त्र विभागात उत्साहात साजरा करण्यात आला. इंटक संस्था, नवी दिल्ली यांनी पर्यावरण मंत्रालयाच्या समवेत व सांस्कृतिक मंत्रालयाच्या सहकार्याने तयार केलेल्या \'गजलोक - वाईल्ड, सेक्रेड, इटर्नल' या माहितीपटाचे प्रथम प्रदर्शन हत्ती दिनाच्या दिवशी दिल्ली येथे झाले. त्याच \'गजलोक\' या माहितीपटाचे प्रदर्शन प्राणिशास्त्र विभागात आयोजित करण्यात आले होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्राणिशास्त्र विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर, प्रमुख अतिथी म्हणून इंटक अमरावती अध्यायचे संयोजक तथा अधिसभा सदस्य डॉ. जयंत वडतकर, प्राणिशास्त्र विभागाचे प्रा. विनोद नागले, इंटकचे सदस्य अॅड. राजमेहेर निशाणे उपस्थित होते.

याप्रसंगी डॉ. जयंत वडतकर यांनी हत्तीदिनाचे महत्व विषद करतांना भारतात हत्तीची सद्यस्थिती, संवर्धनाची आवश्यकता व हत्तीचे संस्कृतीत असलेले महत्वाचे स्थान याविषयी माहिती दिली. तसेच हत्ती परियोजना (प्रकल्प) व इंटक संस्थेची माहिती दिली. यानिमित्ताने इंटक तर्फे तयार केलेला \'गजलोक\' हा माहितीपट विद्यार्थ्यांनी पहावा तसेच इतर ठिकाणी तो दाखवावा असे आवाहन केले. हत्ती या प्राण्यांचे महत्व, त्यांचे संवर्धनाचे प्रश्न आणि आपला सांस्कृतिक वारसा म्हणून असलेले हत्तीचे महत्व माहितीपटाच्या माध्यमातून अधोरेखित केले. यावेळी सर्वांनी या माहितीपटाचा आनंद घेतला.

अध्यक्षीय भाषणात विभागप्रमुख डॉ. हेमलता नांदुरकर यांनी हत्ती या प्राण्यांचे पर्यावरणात असलेले महत्व, मानवाशी जुळलेल्या आठवणी, संवर्धनाचे महत्व सांगितले.

सूत्रसंचालन स्वाती वडुरकर हिने केले. कार्यक्रमाला इंटकचे सदस्य सुमित अंबुलकर, वन्यजीव अभ्यासक अमेय ठाकरे, महेश रोकडे तसेच प्राणिशास्त्र विभागातील प्रा. अंकिता पानसरे, प्रा. प्रांजली हलामी, प्रा. ओवेस मुगल उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यार्थी अविष्कार बाजड, सत्यम ढोबळे, अजय मेटकर, यश पानघाटे, वैष्णवी इंगोले, कोमल मेंढे यांनी अथक परिश्रम घेतले.

**वृत्त केसरी**

### पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा

# कौशल्य आत्मसात करा, रोजगार निश्चित मिळेल

## किरण पातुरकर यांचे आवाहन





**प्रतिनिधी / वृत्त केसरी**

**अमरावती, १९ ऑगस्ट :** पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिलेली नाही. त्यामुळेच केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकास, आत्मनिर्भर भारत यांसारख्या संकल्पनांना प्रत्यक्षात उतरवून विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करावे, रोजगार निश्चित मिळेल, असे आवाहन अमरावती इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष तथा अमरावती विभागीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष किरण पातुरकर यांनी विद्यार्थ्यांना केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील स्वामी विवेकानंद भवन येथे आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावतीचे उपायुक्त द.ल. ठाकरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावतीच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, अमरावती जिल्हा रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष भूषण काळमेघ, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

किरण पातुरकर म्हणाले, अमरावतीच्या तरुणांना अमरावतीतच रोजगार मिळाला पाहिजे. टेक्स्टाईल पार्क, आय.टी. पार्क येत्या काही वर्षात पूर्ण होईल, त्यामुळे स्थानिकांना त्यात मोठ्या प्रमाणात रोजगारही मिळेल. स्वयंसिध्द्च्या माध्यमातून आम्ही अनेकांना स्वतःच्या पायावर उभे केले आहे, असेही ते म्हणाले. याप्रसंगी विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी आलेल्या संधीचा लाभ घ्या, कौशल्य आत्मसात करा, असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. विद्यापीठाचे इन्क्युबेशन सेंटर देखील तुमच्या मदतीला आहे, त्याचा लाभ घ्या, असे सांगून त्यांनी विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास विभागाचे आयोजनासाठी अभिनंदन केले. संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने उद्घाटन कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविकेतून द.ल. ठाकरे यांनी रोजगार मेळवामागील भूमिका स्पष्ट केली. मेळाव्यामध्ये सहभागी झालेल्या उद्योजकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. मुलाखतीनंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन बाबासाहेब मुगले यांनी, तर आभार विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी मानले.

दैनिक दिव्य मराठी

**उपक्रम** • विद्यापीठातील रोजगार मेळाव्यास प्रतिसाद; विद्यार्थ्यांना मिळाली नोकरी

# कौशल्य आत्मसात करा; रोजगार निश्चित मिळेल : किरण पातुरकर





पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याला मंचावर उपस्थित मान्यवर. (दुसऱ्या छायाचित्रात) सहभागी झालेले विविध शाखांमधील युवक व इतर मान्यवर.

**प्रतिनिधी | अमरावती**

'बदलत्या रोजगाराच्या संधींच्या पार्श्वभूमीवर केवळ पदवीपेक्षा विद्यार्थ्यांकडे आवश्यक कौशल्ये असणे अधिक महत्त्वाचे ठरत आहे. केंद्र व राज्य शासनाकडून कौशल्य विकास आणि आत्मनिर्भर भारताच्या माध्यमातून रोजगाराभिमुख शिक्षणाला प्रोत्साहन दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी उपलब्ध संधींचा लाभ घेत कौशल्य आत्मसात करावे, कौशल्य असेल तर रोजगार निश्चित मिळेल,' असे आवाहन अमरावती इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष तथा अमरावती विभागीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष किरण पातुरकर यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास विभाग, विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील स्वामी विवेकानंद भवन येथे आयोजित 'पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्या'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे होते. व्यासपीठावर कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त द. ल. ठाकरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, जिल्हा रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष भूषण काळमेघ आणि विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी विद्यार्थ्यांनी रोजगार मेळाव्यातून मिळणाऱ्या संधींकडे केवळ नोकरीच्या दृष्टीने न पाहता स्वतःच्या करिअरच्या दृष्टीने पाहावे, असे सांगितले. विद्यार्थ्यांनी सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करावीत आणि उपलब्ध प्रत्येक संधीचा लाभ घ्यावा. विद्यापीठातील इन्क्युबेशन सेंटर विद्यार्थ्यांच्या कल्पनांना व्यवसायाचे स्वरूप देण्यासाठी मदतीला आहे. त्याचाही विद्यार्थ्यांनी उपयोग करून घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

रोजगार मेळाव्यात सहभागी झालेल्या विविध उद्योजकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विविध कंपन्यांच्या प्रतिनिधींनी विद्यार्थ्यांच्या मुलाखती घेतल्या. मुलाखतीनंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाबासाहेब मुगले यांनी केले, तर विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी आभार मानले. रोजगार मेळाव्यासाठी विद्यापीठातील विद्यार्थी-विद्यार्थिनींसह विविध शाखांमधील युवकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.

**कौशल्यावर भर; रोजगाराकडे वाटचाल :** बदलत्या उद्योगविश्वात केवळ शैक्षणिक पदवी पुरेशी नसून तांत्रिक ज्ञान, संवादकौशल्य, डिजिटल कौशल्य, टीमवर्क आणि समस्या सोडवण्याची क्षमता यांना मोठी मागणी आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमातील ज्ञानासोबत प्रत्यक्ष कामाचा अनुभव घेणे, प्रशिक्षण व इंटर्नशिपमध्ये सहभागी होणे आणि सातत्याने नवीन कौशल्ये आत्मसात करणे आवश्यक आहे. उद्योगांच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन विद्यार्थ्यांनी स्वतःला रोजगारक्षम बनवण्यावर भर दिल्यास रोजगाराच्या अधिक चांगल्या संधी उपलब्ध होऊ शकतात. कौशल्यविकासातून आत्मविश्वास वाढण्यासोबतच रोजगार आणि स्वयंरोजगाराच्या नव्या वाटाही खुल्या होतील.

### टेक्स्टाइल पार्क, आयटी पार्क प्रकल्पात रोजगाराची संधी

किरण पातुरकर म्हणाले की, तरुणांना रोजगारासाठी मोठ्या शहरांकडे स्थलांतर करण्याची वेळ येऊ नये, यासाठी स्थानिक पातळीवर रोजगाराच्या संधी निर्माण होणे गरजेचे आहे. अमरावतीत टेक्स्टाइल पार्क आणि आयटी पार्कसारखे महत्त्वाकांक्षी प्रकल्प आगामी काळात पूर्णत्वास येणार आहेत. या प्रकल्पांमुळे स्थानिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होण्याची अपेक्षा आहे. तरुणांच्या कौशल्याला योग्य दिशा देऊन त्यांना रोजगारक्षम बनविण्यावर भर देणे आवश्यक आहे. 'स्वयंसिद्धा'च्या माध्यमातून अनेकांना प्रशिक्षण व मार्गदर्शन देत स्वतःच्या पायावर उभे करण्याचे काम करण्यात आले आहे. स्थानिक रोजगारनिर्मितीमुळे तरुणांना भविष्यात आपल्या जिल्ह्यातच उज्ज्वल करिअर घडवता येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

## विद्यापीठ में भी मनाई गई जयंती, कुलपति ने किया अभिवादन



**भास्कर डेस्क|अमरावती.** राजीव गांधी की जयंती विश्वविद्यालय में सद्भावना दिवस के रूप में मनाई गई। कुलपति डॉ. मिलिंद बारहाते ने विश्वविद्यालय की ओर से राजीव गांधी की प्रतिमा का पूजन एवं पुष्पार्पण कर श्रद्धांजलि अर्पित की। कार्यक्रम में प्रबंधन परिषद सदस्य डॉ. आर.डी. सिकची, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, उपकुलसचिव मंगेश वरखेडे, डॉ. श्रीकांत पाटील, उपकुलसचिव डॉ. दादाराव चव्हाण, उपकुलसचिव डॉ. सुलभा पाटील सहित अनेक उपस्थित थे।

दैनिक दिव्य मराठी

स्वातंत्र्य दिन • कुलगुरू डॉ. बारहाते यांच्या हस्ते विद्यापीठात ध्वजारोहण

# अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा प्रकाश पसरवणे हीच खरी राष्ट्रसेवा

प्रतिनिधी | अमरावती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने शैक्षणिक विकासामध्ये दिलेले योगदान उल्लेखनीय असून सर्व शिक्षक व विद्यार्थी या योगदानामधील सातत्य कायम ठेवतील. अज्ञानाचा अंधार दूर करुन ज्ञानाचा व कौशल्याचा प्रकाश पसरवणे हीच आपली खरी राष्ट्रसेवा असेल, असे प्रतिपादन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांनी केले. विद्यापीठात ८० वा भारतीय स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. बारहाते यांनी ध्वजारोहण केले, त्याप्रसंगी मार्गदर्शन करतांना ते बोलत होते. ध्वजस्तंभाजवळ प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर, पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत व राजेश पिदडी आदींची प्रमुख उपस्थिती होती.

ध्वजारोहणप्रसंगी उपस्थितांना संबोधित करतांना कुलगुरू डॉ. बारहाते म्हणाले, वीर हुतात्म्यांनी आपल्या प्राणांचे बलिदान देऊन आपल्याला स्वातंत्र्य मिळवून दिले, त्यांच्या त्यागाचे स्मरण करण्याचा आणि त्यांच्या चरणी नम्र कृतज्ञता व्यक्त करण्याचा आजचा हा दिवस आहे. शिक्षण हे समाज परिवर्तनाचे



विद्यापीठात ध्वजारोहणाला उपस्थित प्राध्यापक व इतर.

आणि राष्ट्र उभारणीचे सर्वात मोठे साधन आहे. संत गाडगे बाबा यांच्या नावाने ओळखल्या जाणाया आपल्या विद्यापीठाने नेहमीच ज्ञान, विज्ञान, तंत्रज्ञान, साहित्य, सांस्कृतिक, क्रीडा आणि सामाजिक बांधीलकीचा वारसा पुढे चालवला आहे. विद्यापीठाने प्रतिष्ठित क्युएस रँकिंगमध्ये मानाचे स्थान मिळवले असून एशियन युनिव्हर्सिटी रँकिंगमध्ये १००१-११०० बँडमध्ये आणि दक्षिण आशियामध्ये ३३०वा क्रमांक पटकावला आहे. हे यश आपल्या सर्वांच्या प्रचंड मेहनतीचे फलित आहे.

विद्यापीठाने ए.आय. सह नवीन अभ्यासक्रम सुरू केले आहेत, त्याचा निश्चितच विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे. विद्यापीठ व महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. अनेकांना स्टार्टअप साठी फंड सुद्धा दिला गेला आहे. त्यामुळे अधिकाधिक स्टार्टअप भविष्यात तयार करण्यासाठी चालना मिळणार आहे.

आंतरराष्ट्रीय परिषदेत रुबिना चांद शेख आणि डॉ. अनिता पाटील व अनघा मोरोपंत उंदिरवाडे यांनी मिळविलेले यश उल्लेखनीय आहे. विद्यापीठाचे विद्यार्थी, खेळाडू, कलावंत, कलाकार, संशोधक यांनी विद्यापीठाच्या नावलौकिकामध्ये भर घातली आहे. आंतर विद्यापीठ आणि अखिल भारतीय स्तरावरील क्रीडा स्पर्धा, सांस्कृतिक स्पर्धा, संशोधन स्पर्धा आणि इतरही स्पर्धांमध्ये विद्यापीठाच्या विद्यार्थ्यांनी दर्जेदार व नेत्रदीपक कामगिरी करुन पदके व पारितोषिके मिळवली आहेत. विद्यापीठाच्या प्रशासकीय व शैक्षणिक विकासामध्ये विशेषतः भौतिक विकास यामध्ये सुद्धा विद्यापीठाचे अधिकारी आणि कर्मचायांचे फार मोठे योगदान आहे.

भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी त्याग व बलीदान देणाया सर्व स्वातंत्र्यसैनिकांचे स्मरण करुन कुलगुरूंनी सर्वांना स्वातंत्र्य दिनाच्या शुभेच्छा दिल्यात. संचालन पदव्युत्तर शारीरिक शिक्षण विभागप्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी केले. स्वातंत्र्य दिन कार्यक्रमाला विद्यापीठातील संवैधानिक अधिकारी, शैक्षणिक व प्रशासकीय विभागप्रमुख, शिक्षक, अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.

## संशोधक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी

विद्यापीठ परिक्षेत्रातील सर्व विद्यार्थी, कलावंत, खेळाडू, संशोधक यांनी अधिकाधिक प्रयत्न करुन आपल्या कामगिरीमध्ये अधिक वाढ करावी आणि विद्यापीठाचा नावलौकिक आंतरराष्ट्रीय स्तरावर सातत्याने पोहोचविण्याकरीता प्रयत्न करावा. तसेच नाविन्यपूर्ण उपक्रम, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय परिसंवादामध्ये सादर केलेल्या प्रकल्पधारीत संशोधन पत्र, पेटेन्ट, महत्वपूर्ण सामाजिक विषय आणि नाविन्यपूर्ण शोध किंवा योगदान, यासाठी युजी, पीजी आणि पीएच.डी. च्या संशोधक विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक उत्कृष्टतेसाठी कुलगुरू फेलोशीप सुरु करण्यात आली असून त्याचा विद्यार्थ्यांनी लाभ घ्यावा, असे आवाहन कुलगुरूंनी याप्रसंगी केले.

पुण्य नगरी

# कौशल्य आत्मसात करा, रोजगार निश्चित मिळेल

**किरण पातुरकर यांचे प्रतिपादन**

**विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा**

**पुण्य नगरी** / प्रतिनिधी



**अमरावती :** पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिलेली नाही. त्यामुळेच केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकास, आत्मनिर्भर भारत यांसारख्या संकल्पनांना प्रत्यक्षात उतरवून विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करावे, रोजगार निश्चित मिळेल, असे प्रतिपादन अमरावती इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष तथा अमरावती विभागीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष किरण पातुरकर यांनी केले.

संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील स्वामी विवेकानंद भवन येथे आयोजित पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात उद्घाटक म्हणून ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय येथील उपायुक्त द. ल. ठाकरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या साहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, अमरावती जिल्हा रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष भूषण काळमेघ, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर आदी उपस्थित होते.

याप्रसंगी विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी आलेल्या संधीचा लाभ घ्या, कौशल्य आत्मसात करा, असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. संत गाडगेबाबा यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रास्ताविक द. ल. ठाकरे यांनी केले. याप्रसंगी रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी झालेल्या उद्योजकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मुलाखतीनंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. कार्यक्रमाचे संचालन बाबासाहेब मुगले तर आभार प्रदर्शन विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी केले.

आपली मातृभूमि

# कौशल्य आत्मसात करा, रोजगार निश्चित मिळेल

*** किरण पातुरकर यांचे प्रतिपादन * विद्यापीठात पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा**

**आमा प्रतिनिधी/२० ऑगस्ट**



**अमरावती** – पूर्वीसारखी परिस्थिती आता राहिलेली नाही. त्यामुळेच केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकास, आत्मनिर्भर भारत यांसारख्या संकल्पनांना प्रत्यक्षात उतरवून विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करावे, रोजगार निश्चित मिळेल, असे आवाहन अमरावती इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष तथा अमरावती विभागीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष श्री किरण पातुरकर यांनी विद्यार्थ्यांना केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावती आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील स्वामी विवेकानंद भवन येथे आयोजित'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते. व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय अमरावतीचे उपायुक्त श्री द.ल. ठाकरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावतीच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, विभागीय कृषी सहसंचालक श्री गणेश घोरपडे, अमरावती जिल्हा रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष भूषण काळमेघ, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते. किरण पातुरकर म्हणाले, अमरावतीच्या तरुणांना अमरावतीतच रोजगार मिळाला पाहिजे. टेक्स्टाईल पार्क, आय.टी. पार्क येत्या काही वर्षात पूर्ण होईल, त्यामुळे स्थानिकांना त्यात मोठए प्रमाणात रोजगारही मिळेल. स्वयंसिध्दा च्या माध्यमातून आम्ही अनेकांना स्वत:च्या पायावर उभे केले आहे, असेही ते म्हणाले. याप्रसंगी विभागीय कृषी सहसंचालक श्री गणेश घोरपडे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी आलेल्या संधीचा लाभ घ्या, कौशल्य आत्मसात करा, असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. याप्रसंगी रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी झालेल्या उद्योजकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मुलाखतीनंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन श्री बाबासाहेब मुगले यांनी, तर आभार विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी मानले. रोजगार मेळाव्यामध्ये मोठए संख्येने विद्यार्थी व विद्यार्थीनी उपस्थित होते.

आपली मातृभूमि

**पाठबळ • विद्यार्थी, नवउद्योजकांना स्टार्टअप, नवकला, उद्योजकतेसाठी मिळणार आता मार्गदर्शन**

# 'अमृत-एसआरआयएफ' देणार विद्यापीठाला दिशा

**प्रतिनिधी | अमरावती**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील रिसर्च अँड इन्क्युबेशन फाउंडेशन आणि अमृत यांच्या संयुक्त विद्यमाने राबवण्यात येणा-या 'अमृत - एसआरआयएफ' योजनेमुळे विद्यापीठाला नवी दिशा मिळण्याचा मार्ग खुला झाला आहे.

याचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते व अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांच्या शुभहस्ते करण्यात आले. विद्यापीठातील विद्यार्थी, नवउद्योजक आणि स्टार्टअप्सना उद्योग तसेच व्यवसाय क्षेत्रासाठी आवश्यक मार्गदर्शन हे या योजनेचे प्रमुख कार्य राहणार आहे. याशिवाय इन्क्युबेशन सुविधा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि उद्योजकता विकासासाठी आवश्यक सहाय्यही या योजनेद्वारे उपलब्ध करून देण्यात येईल. उद्घाटनप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ.असनारे, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, अमृतचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरुळकर, विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर, जिल्हा व्यवस्थापक ऋषिकेश कथलकर उपस्थित होते.'नवकल्पनेतून उद्योजकता आणि उद्योजकतेतून रोजगारनिर्मिती' या संकल्पनेला चालना मिळणार आहे. योजना विदर्भातील स्टार्टअप व उद्योजकता परिसंस्था अधिक सक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल ठरणार आहे.



अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांच्यासह कुलगुरु डॉ. मिलींद बारहाते व विद्यापीठाचे इतर अधिकारी.

**दिव्य मराठी नॉलेज**

**स्टार्टअप उभारणी, मॉडेल तयार**

'अमृत - एसआरआयएफ' योजनेच्या माध्यमातून पात्र विद्यार्थी व नवउद्योजकांना त्यांच्या नाविन्यपूर्ण कल्पनांना व्यावसायिक स्वरुप देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध होणार आहे. नवकल्पना विकसित करणे, स्टार्टअप उभारणी, व्यवसाय मॉडेल तयार करणे, बाजारपेठेची समज विकसित करणे, तज्ज्ञ मार्गदर्शन व मेंटॉरिंग, इन्क्युबेशनच्या माध्यमातून आवश्यक सुविधावर भर देण्यात येईल.

**विश्लेषण**

**अशी मिळेल बळकटी**

एसजीबीएयू रिसर्च अँड इन्क्युबेशन फाउंडेशन (एसआरआयएफ) हे विद्यापीठातील विद्यार्थी, संशोधक आणि नवउद्योजकांच्या अभिनव कल्पनांना स्टार्टअप व उद्योगांमध्ये रुपांतरित करण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. अमृतमुळे त्यात अधिक भर पडणार असून उद्योजकतेकडे वळू इच्छिणा-या युवकांना विद्यापीठाच्या इन्क्युबेशन इकोसिस्टमचा लाभ मिळेल. कल्पनांना प्रत्यक्ष व्यवसायामध्ये रुपांतरित करण्यासाठी आवश्यक पाठबळही उपलब्ध होणार आहे.

सकाळ



**अमरावती :** रोजगार मेळाव्याला उपस्थित किरण पातूरकर यांच्यासह विद्यापीठातील पदाधिकारी.

# कौशल्य आत्मसात करा, रोजगार निश्चित मिळेल

## किरण पातूरकर : विद्यापीठात रोजगार मेळाव्याला उत्स्फूर्त प्रतिसाद

■ **सकाळ वृत्तसेवा**

अमरावती, ता. २१ : केंद्र व राज्य शासनाने कौशल्य विकास, आत्मनिर्भर भारत यासारख्या संकल्पनांना प्रत्यक्षात उतरवून विद्यार्थ्यांना रोजगारभिमुख शिक्षण दिले जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी कौशल्य आत्मसात करावे, रोजगार निश्चित मिळेल, असे आवाहन अमरावती इंडस्ट्रियल असोसिएशनचे अध्यक्ष तथा अमरावती विभागीय रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष किरण पातुरकर यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालय आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या संयुक्त विद्यमाने विद्यापीठातील स्वामी विवेकानंद भवन येथे आयोजित 'पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळाव्याचे' उद्घाटनीय भाषण करतांना ते बोलत होते.

व्यासपीठावर अध्यक्षस्थानी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कौशल्य विकास, विभागीय आयुक्त कार्यालयाचे उपायुक्त द. ल. ठाकरे, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शनाच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर, विभागीय कृषी सहसंचालक गणेश घोरपडे, अमरावती जिल्हा रोजगार मेळावा समितीचे अध्यक्ष भूषण काळमेघ, विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर उपस्थित होते.

अध्यक्षीय भाषण करतांना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी आलेल्या संधीचा लाभ घ्या, कौशल्य आत्मसात करा, असा मोलाचा सल्ला विद्यार्थ्यांना दिला.

प्रास्ताविकेतून द. ल. ठाकरे यांनी रोजगार मेळाव्यामागील भूमिका स्पष्ट केली. याप्रसंगी रोजगार मेळाव्यामध्ये सहभागी झालेल्या उद्योजकांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. तसेच मुलाखतीनंतर निवड झालेल्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते ऑफर लेटर प्रदान करण्यात आले. सूत्रसंचालन बाबासाहेब मुगले यांनी, तर आभार विद्यार्थी विकास संचालक डॉ. राजीव बोरकर यांनी मानले.

अमरावती हायलाईट

# राष्ट्रसंतांचे विचार कृतीत आणा!





अमरावती दि. २१ :- राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केवळ विचार दिले नाही, तर त्यांनी समाजातील असलेली व्यसने, अंधश्रध्दा, अज्ञान, दारिद्र्य हे प्रत्यक्ष अनुभवले आणि त्यानंतरच त्यांनी उपदेश केला. ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील त्यांनी सांगितलेले आचारप्राबल्य जोपर्यंत आपण प्रत्यक्ष कृतीत आनणार नाही, तोपर्यंत त्याची पूर्तता होणार नाही. म्हणून राष्ट्रसंतांचे विचार प्रत्यक्ष कृतित आणा, असे प्रतिपादन अमरावतीचे प्रसिध्द साहित्यिक व वक्ते डॉ. सतीश तराळ यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग व वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने तिवसा येथे आयोजित प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृति ग्रामगीता व्याख्यानमाला प्रसंगी 'ग्रामगीतेतील लोकवशिकरण पंचकातील आचार प्राबल्य' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती तथा वनराईचे अमरावती अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे आचार्य हरिभाऊ विरुळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.आर. देशमुख, विद्यापीठाच्या संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना डॉ. सतीश तराळ म्हणाले, चारित्र्य आणि आत्मशुध्दी खूप महत्वाची आहे. लोकांना तत्वज्ञान सांगणे आणि प्रबोधन करणे सोपे आहे, परंतु त्याप्रमाणे स्वत:चे जीवन जगणे अत्यंत कठीण आहे. आज देशामध्ये असलेली परिस्थिती बिघडत चालली असून अशा बिघडलेल्या परिस्थितीमध्ये गाव सुधारण्याचा किंवा निर्माण करण्याचा एकमेव उपाय म्हणजे आत्मशुध्दी होय. ज्या व्यक्तिंची आत्मशुध्दी झाली आहे, त्यांचे चारित्र्य शुध्द आहे, त्याच व्यक्तींच्या मागे लोकं जातात आणि त्यांचे ऐकतात. परंतु यासाठी दुस–यांना उपदेश करण्यापूर्वी प्रत्येकाने स्वत:ची जीवनचर्या, साधना आणि आपले जीवन तपासून पाहिले पाहिजे. व्यक्तींमध्ये युक्ती आणि विचारचारित्र्य असणे आवश्यक आहे. नुसते लोकांना व्यसन सोडण्याचा किंवा सुधारण्याचा उपदेश करुन चालत नाही.तर त्याप्रमाणे स्वत: कृती करण्याची गरज आहे.

स्वत:चे चारित्र्य आणि पात्रता निर्माण करण्यासाठी स्वत:पासून सुरुवात केली पाहिजे. संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गोविंद प्रभू, महात्मा गांधी, शामरावदादा मोकदम, महात्मा फुले, नरेंद्र दाभोळकर यांनी प्रत्यक्ष कृती केली आणि त्यानंतर समाजाला उपदेश दिला. गोविंद प्रभू यांनी सहाशे वर्षाआधी समाजपरिवर्तनाचे कार्य केले. संत गाडगे बाबांनी बारा वर्ष समाजात राहून भटकंती व साधना केली आणि त्यातून ते शिकले, समाजाची नाळ त्यांनी ओळखली. समाजाला कशाची गरज आहे, हे ओळखून आणि दशसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी रोकडा धर्म दिला. राष्ट्रपिता महात्मा गांधी जगभर फिरले. समाजाच्या काय समस्या आहेत, त्या त्यांनी जाणून घेतल्या आणि भारतीय स्वातंत्र्यासाठी लढा दिला. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुध्दा केवळ उपदेश केला नाही, तर स्वत: प्रत्यक्ष कृती करुन समाजासमोर आदर्श निर्माण केला, विचार मांडले.

शामरावदादांनी राष्ट्रसंतांच्या मार्गदर्शनाखाली आरती मंडळ स्थापन करण्याचे महत्वाचे कार्य प्रत्यक्ष कृतीतून केले. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी आणि लोकांमध्ये राष्ट्रभक्तीची व बलिदानाची भावना जागृत करण्यासाठी शामरावदादांनी गावोगावी जावून प्रचार केला. राष्ट्रसंतांचे संपूर्ण जीवन हे प्रत्यक्ष कृती आणि आचार प्राबल्यावर आधारित होते. त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून समाजप्रबोधन केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे केवळ महाराष्ट्र आणि भारतापूरतेच मर्यादीत नसून ते जगातील एक महान विज्ञासंत आहेत. स्वामी विवेकानंदांनी शिकागो धर्मपरिषदेत विचार मांडले. तर राष्ट्रसंतांनी सुध्दा जपान येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत विचार मांडले. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केवळ गावाच्या विकासासाठी विचार मांडले नाही, तर गांव हा विश्वाचा नकाशा मानून संपूर्ण जगाचे स्वरुप बदलण्याची क्षमता त्यांच्या विचारात दिसून येते. त्यांची देव आणि धर्माची संकल्पना मानवतावादी होती. राष्ट्रसंतांचे संपूर्ण जीवन हे कर्मयज्ञ, कृतीयज्ञ आणि आचारधर्माचे मूर्तीमंत रुप होते, असेही त्यांनी सांगितले. यावेळी श्री मधुभाऊ घारड व श्री हरिभाऊ विरुळकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, संतांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे आणि विद्यापीठाचा विद्यार्थी चारित्र्यसंपन्न घडावा, भारताच्या विकासामध्ये त्याचे योगदान रहावे, याकरिता अभ्यासासोबतच संतांचे विचार त्यांच्यापर्यंत पोहचावे, या उद्देशाने विद्यापीठाच्यावतीने अशाप्रकारच्या व्याख्यानमालांचे आयोजन केल्या जाते. डॉ. सतीश तराळ यांनी ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील आचारप्राबल्य हा विषय अतिशय सोप्या भाषेत विद्यार्थ्यांसमोर मांडला. संतानी समाजाला केवळ विचार दिले नाहीत, तर प्रत्यक्ष त्यांनी कृती केली आणि कृतीतून समाजाला पटेल असे विचार मांडले, विद्यार्थ्यांनी सुध्दा प्रत्यक्ष कृती करावी आणि आपले जीवन समृध्द कसे होईल यावर भर द्यावा, असेही ते म्हणाले.

संत गाडगे बाबा, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, शामरावदादा मोकदम व यादवराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीत व संस्थागीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी शामराव मोकदम यांच्यावरील पुस्तकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. सतीश तराळ यांनी महाविद्यालयाला त्यांनी लिहिलेली पुस्तके भेट दिली. स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, सूत्रसंचालन प्रा. विनोद खडसे, तर आभार ग्रंथपाल प्रा. रविंद्र पाटील यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, राष्ट्रसंतांचे भाविक भक्त, मोकदम कुटुंबातील सदस्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

हिंदुस्थान

# विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमाला संपन्न



अमरावती दि. २१ : राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केवळ विचार दिले नाही, तर त्यांनी समाजातील असलेली व्यसने, अंधश्रध्दा, अज्ञान, दारिद्र्य हे प्रत्यक्ष अनुभवले आणि त्यानंतरच त्यांनी उपदेश केला. ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील त्यांनी सांगितलेले आचारप्राबल्य जोपर्यंत आपण प्रत्यक्ष कृतीत आणणार नाही, तोपर्यंत त्याची पूर्तता होणार नाही. म्हणून राष्ट्रसंतांचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणा, असे प्रतिपादन अमरावतीचे प्रसिध्द साहित्यिक व वक्ते डॉ. सतीश तराळ यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग व वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने तिवसा येथे आयोजित प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमाला प्रसंगी 'ग्रामगीतेतील लोकवशिकरण पंचकातील आचार प्राबल्य' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती तथा वनराईचे अमरावती अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे आचार्य हरिभाऊ विरुळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.आर. देशमुख, विद्यापीठाच्या संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

विषयाची मांडणी करतांना डॉ. सतीश तराळ म्हणाले, चारित्र्य आणि आत्मशुध्दी खुप महत्वाची आहे. लोकांना तत्वज्ञान सांगणे आणि प्रबोधन करणे सोपे आहे, परंतु त्याप्रमाणे स्वत:चे जीवन जगणे अत्यंत कठीण आहे. आज देशामध्ये असलेली परिस्थिती बिघडत चालली असून अशा बिघडलेल्या परिस्थितीमध्ये गाव सुधारण्याचा किंवा निर्माण करण्याचा एकमेव उपाय म्हणजे आत्मशुध्दी होय. ज्या व्यक्तींची आत्मशुध्दी झाली आहे, त्यांचे चारित्र्य शुध्द आहे, त्याच व्यक्तींच्या मागे लोकं जातात आणि त्यांचे ऐकतात. परंतु यासाठी दुस-यांना उपदेश करण्यापूर्वी प्रत्येकाने स्वत:ची जीवनचर्या, साधना आणि आपले जीवन तपासून पाहिले पाहिजे. व्यक्तींमध्ये युक्ती आणि विचारचारित्र्य असणे आवश्यक आहे. नुसते लोकांना व्यसन सोडण्याचा किंवा सुधारण्याचा उपदेश करुन चालत नाही.तर त्याप्रमाणे स्वत: कृती करण्याची गरज आहे.

स्वत:चे चारित्र्य आणि पात्रता निर्माण करण्यासाठी स्वत:पासून सुरुवात केली पाहिजे. संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गोविंद प्रभू, महात्मा गांधी, शामरावदादा मोकदम, महात्मा फुले, नरेंद्र दाभोळकर यांनी प्रत्यक्ष कृती केली आणि त्यानंतर समाजाला उपदेश दिला. गोविंद प्रभू यांनी सहाशे वर्षाआधी समाजपरिवर्तनाचे कार्य केले. संत गाडगे बाबांनी बारा वर्ष समाजात राहून भटकंती व साधना केली आणि त्यातून ते शिकले, समाजाची नाळ त्यांनी ओळखली. समाजाला कशाची गरज आहे, हे ओळखून आणि दशसूत्रीच्या माध्यमातून त्यांनी रोकडा धर्म दिला. राष्ट्रपिता महात्मा गांधी जगभर फिरले. समाजाच्या काय समस्या आहेत, त्या त्यांनी जाणून घेतल्या आणि भारतीय स्वातंत्र्यासाठी लढा दिला. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुध्दा केवळ उपदेश केला नाही, तर स्वत: प्रत्यक्ष कृती करुन समाजासमोर आदर्श निर्माण केला, विचार मांडले.

शामरावदादांनी राष्ट्रसंतांच्या मार्गदर्शनाखाली आरती मंडळ स्थापन करण्याचे महत्वाचे कार्य प्रत्यक्ष कृतीतून केले. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी आणि लोकांमध्ये राष्ट्रभक्तीची व बलिदानाची भावना जागृत करण्यासाठी शामरावदादांनी गावोगावी जावून प्रचार केला. राष्ट्रसंतांचे संपूर्ण जीवन हे प्रत्यक्ष कृती आणि आचार प्राबल्यावर आधारित होते. त्यांनी प्रत्यक्ष कृतीतून समाजप्रबोधन केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे केवळ महाराष्ट्र आणि भारतापूरतेच मर्यादीत नसून ते जगातील एक महान विज्ञासंत आहेत. स्वामी विवेकानंदांनी शिकागो धर्मपरिषदेत विचार मांडले. तर राष्ट्रसंतांनी सुध्दा जपान येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत विचार मांडले. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केवळ गावाच्या विकासासाठी विचार मांडले नाही, तर गांव हा विश्वाचा नकाशा मानून संपूर्ण जगाचे स्वरुप बदलण्याची क्षमता त्यांच्या विचारात दिसून येते. त्यांची देव आणि धर्माची संकल्पना मानवतावादी होती. राष्ट्रसंतांचे संपूर्ण जीवन हे कर्मयज्ञ, कृतीयज्ञ आणि आचारधर्माचे मूर्तीमंत रुप होते, असेही त्यांनी सांगितले. यावेळी श्री मधुभाऊ घारड व श्री हरिभाऊ विरुळकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, संतांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे आणि विद्यापीठाचा विद्यार्थी चारित्र्यसंपन्न घडावा, भारताच्या विकासामध्ये त्याचे योगदान रहावे, याकरिता अभ्यासासोबतच संतांचे विचार त्यांच्यापर्यंत पोहचावे, या उद्देशाने विद्यापीठाच्यावतीने अशाप्रकारच्या व्याख्यानमालांचे आयोजन केल्या जाते. डॉ. सतीश तराळ यांनी ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील आचारप्राबल्य हा विषय अतिशय सोप्या भाषेत विद्यार्थ्यांसमोर मांडला. संतानी समाजाला केवळ विचार दिले नाहीत, तर प्रत्यक्ष त्यांनी कृती केली आणि कृतीतून समाजाला पटेल असे विचार मांडले, विद्यार्थ्यांनी सुध्दा प्रत्यक्ष कृती करावी आणि आपले जीवन समृद्ध कसे होईल यावर भर द्यावा, असेही ते म्हणाले.

संत गाडगे बाबा, छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. पंजाबराव उपाख्य भाऊसाहेब देशमुख, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, शामरावदादा मोकदम व यादवराव देशमुख यांच्या प्रतिमेचे पूजन, पुष्पार्पण, दीपप्रज्वलन करुन विद्यापीठ गीत व संस्थागीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. याप्रसंगी शामराव मोकदम यांच्यावरील पुस्तकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. सतीश तराळ यांनी महाविद्यालयाला त्यांनी लिहिलेली पुस्तके भेट दिली. स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, सूत्रसंचालन प्रा. विनोद खडसे, तर आभार ग्रंथपाल प्रा. रविंद्र पाटील यांनी मानले. व्याख्यान कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक, राष्ट्रसंतांचे भाविक भक्त, मोकदम कुटुंबातील सदस्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थीनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. राष्ट्रवंदनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

मराठी दैनिक
वृत्त केसरी
नवा संकल्प नवी दृष्टी

प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमाला

# राष्ट्रसंतांचे विचार कृतीत आणा

## डॉ. सतीश तराळ यांचे आवाहन

प्रतिनिधी/ वृत्त केसरी





अमरावती , २१ ऑगस्ट: राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केवळ विचार दिले नाही, तर त्यांनी समाजातील असलेली व्यसने, अंधश्रध्दा, अज्ञान, दारिद्रय हे प्रत्यक्ष अनुभवले आणि त्यानंतरच त्यांनी उपदेश केला. ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील त्यांनी सांगितलेले आचारप्राबल्य जोपर्यंत आपण प्रत्यक्ष कृतीत आणणार नाही, तोपर्यंत त्याची पूर्तता होणार नाही. म्हणून राष्ट्रसंतांचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणा, असे प्रतिपादन साहित्यिक व वक्ते डॉ. सतीश तराळयांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, अमरावती यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग व वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा यांच्या संयुक्त विद्यमाने तिवसा येथे आयोजित प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम स्मृति ग्रामगीता व्याख्यानमाला प्रसंगी 'ग्रामगीतेतील लोकवशिकरण पंचकातील आचार प्राबल्य' या विषयावर व्याख्यान देतांना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रचारभिष्म शामरावदादा मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती तथा वनराईचे अमरावती अध्यक्ष श्री मधुभाऊ घारड, अखिल भारतीय श्री गुरुदेव सेवा मंडळाचे आचार्य हरिभाऊ विरुळकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एच.आर. देशमुख, विद्यापीठाच्या संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

डॉ. सतीश तराळम्हणाले, चारित्र्य आणि आत्मशुध्दी खूप महत्वाची आहे. लोकांना तत्वज्ञान सांगणे आणि प्रबोधन करणे सोपे आहे, परंतु त्याप्रमाणे स्वतःचे जीवन जगणे कठीण आहे. आज देशामध्ये असलेली परिस्थिती बिघडत चालली असून अशा बिघडलेल्या परिस्थितीमध्ये गाव सुधारण्याचा किवा निर्माण करण्याचा एकमेव उपाय म्हणजे आत्मशुध्दी होय. ज्या व्यक्तींची आत्मशुध्दी झाली आहे, त्यांचे चारित्र्य शुध्द आहे, त्याच व्यक्तींच्या मागे लोकं जातात आणि त्यांचे ऐकतात. परंतु यासाठी दुस-यांना उपदेश करण्यापूर्वी प्रत्येकानेस्वतःचीजीवनचर्या, साधना आणि आपले जीवन तपासून पाहिले पाहिजे. व्यक्तींमध्ये युक्ती आणि विचारचारित्र्य असणे आवशयक आहे. नुसते लोकांना व्यसन सोडण्याचा किवा सुधारण्याचा उपदेश करुन चालत नाही.तर त्याप्रमाणे स्वतः कृती करण्याची गरज आहे. चारित्र्य आणि पात्रता निर्माण करण्यासाठी स्वतःपासूनसुरुवातकेलीपाहिजे. संतगाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गोविद प्रभू, महात्मा गांधी, शामरावदादा मोकदम, महात्मा फुले, नरेंद्र दाभोळकर यांनी प्रत्यक्ष कृती केली आणि त्यानंतर समाजाला उपदेश दिला.

गोविद प्रभू यांनी सहाशे वर्षाआधी समाजपरिवर्तनाचे कार्य केले. संत गाडगे बाबांनी बारा वर्ष समाजात राहुन भटकंती व साधना केली आणि त्यातून ते शिकले, समाजाची नाळ त्यांनी ओळखली. समाजाला कशाची गरज आहे, हे ओळखून आणि दशसूत्रीच्यामाध्यमातून त्यांनीरोकडा धर्म दिला. राष्ट्रपिता महात्मा गांधी जगभर फिरले. समाजाच्या काय समस्या आहेत, त्या त्यांनी जाणून घेतल्या आणि भारतीय स्वातंत्र्यासाठीलढादिला. क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सुध्दा केवळ उपदेश केला नाही, तर स्वतः प्रत्यक्ष कृती करुन समाजासमोर आदर्श निर्माण केला, विचार मांडले. यावेळी श्री मधुभाऊ घारड व श्रीहरिभाऊ विरुळकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

अध्यक्षीय भाषणात प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, संतांचे विचार विद्यार्थ्यांपर्यंत पोहचावे आणि विद्यापीठाचा विद्यार्थी चारित्र्यसंपन्न घडावा, भारताच्या विकासामध्येत्याचेयोगदानरहावे, याकरिता अभ्यासासोबतचसंतांचेविचारत्यांच्यापर्यंत पोहचावे, या उद्देशाने विद्यापीठाच्यावतीने अशाप्रकारच्या व्याख्यानमालांचे आयोजन केल्या जाते. याप्रसंगी शामराव मोकदम यांच्यावरील पुस्तकाचे विमोचन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. डॉ. सतीश तराळ यांनी महाविद्यालयाला त्यांनी लिहिलेली पुस्तके भेट दिली. स्वागतपर भाषण महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, प्रास्ताविक जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर यांनी, सूत्रसंचालन प्रा. विनोद खडसे, तर आभार ग्रंथपाल प्रा. रविंद्र पाटील यांनी मानले.

# राष्ट्रसंतांचे विचार आचरणात आणा-डॉ. सतीश तराळ

शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमाला



आम्मा प्रतिनिधी/२१ ऑगस्ट

अमरावती : राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेच्या माध्यमातून केवळ कोरडा उपदेश दिला नाही, तर समाजातील व्यसने, अंधश्रद्धा, अज्ञान आणि दारिद्र्य स्वतः अनुभवून त्याला परिवर्तनाची दिशा दिली. ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकात सांगितलेले आचारप्राबल्य जोपर्यंत आपण स्वतःच्या आचरणात आणत नाही, तोपर्यंत राष्ट्रसंतांच्या विचारांची पूर्तता होणार नाही, असे आग्रही प्रतिपादन अमरावतीचे प्रसिद्ध साहित्यिक व अभ्यासू वक्ते डॉ. सतीश तराळ यांनी केले. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्यावतीने तिवसा येथील वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालयात आयोजित 'प्रचारभीष्म शामरावदादा मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमालेत' 'ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील आचार प्राबल्य' या विषयावर ते बोलत होते. आत्मशुद्धी आणि चारित्र्यातूनच समाजपरिवर्तनाची सुरुवात आपल्या अभ्यासपूर्ण मांडणीत डॉ. तराळ म्हणाले की, लोकांना तत्त्वज्ञान सांगणे सोपे असते, पण स्वतः त्याप्रमाणे जगणे अत्यंत कठीण आहे. आजची बिघडलेली परिस्थिती सुधारण्यासाठी आत्मशुद्धी हाच एकमेव मार्ग आहे. ज्यांचे चारित्र्य शुद्ध असते, त्यांच्याच मागे समाज उभा राहतो. संत गाडगे बाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, गोविंद प्रभु, महात्मा गांधी, शामरावदादा मोकदम, महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि नरेंद्र दाभोळकर या सर्व महापुरुषांनी स्वतः आधी कृती केली आणि मगच समाजाला उपदेश दिला. संत गाडगे बाबांनी १२ वर्षे भटकंती करून समाजाची नाळ ओळखली आणि दशसूत्रीच्या माध्यमातून रोकडा धर्म दिला. राष्ट्रसंतांनी जपानच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत विचार मांडून विश्वाला मानवतावादी मार्ग दाखवला. त्यांचे जीवन म्हणजे प्रत्यक्ष कर्मयज्ञ होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थाना वरून बोलताना प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे यांनी विद्यार्थ्यांना संतांच्या विचारांची कास धरून चारित्र्यसंपन्न जीवन जगण्याचे आवाहन केले. या सोहळ्यात शामरावदादा मोकदम यांच्यावरील पुस्तकाचे विमोचन करण्यात आले. व्यासपीठावर मधुभाऊ घारड, आचार्य हरिभाऊ विरूळकर, प्राचार्य डॉ. एच.आर. देशमुख, डॉ. दिलीप काळे आणि डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते.

दैनिक दिव्य मराठी

**प्रबोधन** • विद्यापीठातर्फे प्रचारभिष्म शामराव मोकदम स्मृती ग्रामगीता व्याख्यानमाला

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांचे विचार कृतीत आणा : डॉ. तराळ



व्याख्यानमाला प्रसंगी मंचावर उपस्थित मान्यवर. ( दुसऱ्या छायाचित्रात ) प्राध्यापक, राष्ट्रसंतांचे भाविक भक्त, मोकदम कुटुंबातील सदस्य, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी.

**प्रतिनिधी | अमरावती**

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी ग्रामगीतेतून विचार दिले नाही, तर त्यांनी समाजातील व्यसने, अंधश्रद्धा, अज्ञान, दारिद्र हे प्रत्यक्ष अनुभवले, त्यानंतरच त्यांनी उपदेश केला. ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील त्यांनी सांगितलेले आचारप्राबल्य जोपर्यंत कृतीत आणणार नाही, तोपर्यंत त्याची पूर्तता होणार नाही. म्हणून राष्ट्रसंतांचे विचार प्रत्यक्ष कृतीत आणा, असे प्रतिपादन डॉ. सतीश तराळ यांनी केले.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातर्फे प्रचारभिष्म शामराव मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समितीकडून प्राप्त दाननिधीमधून संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा जनसंपर्क विभाग व वाय.डी.व्ही.डी. कला व वाणिज्य महाविद्यालयाच्या संयुक्त सहकार्याने तिवसा येथे आयोजित प्रचारभिष्म शामराव मोकदम स्मृति ग्रामगीता व्याख्यानमाला प्रसंगी 'ग्रामगीतेतील लोकवशिकरण पंचकातील आचार प्राबल्य' यावर व्याख्यान देताना ते बोलत होते. विचारपीठावर अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, प्रचारभिष्म शामराव मोकदम जन्मशताब्दी केंद्रीय समिती, वनराईचे अध्यक्ष मधु घारड, अ.भा. श्री गुरुदेव सेवा मंडळाचे आचार्य हरिभाऊ वेरुळकर, प्राचार्य डॉ. एच.आर. देशमुख, विद्यापीठाच्या संत गाडगे बाबा अध्यासन केंद्राचे प्रमुख डॉ. दिलीप काळे, जनसंपर्क अधिकारी डॉ. विलास नांदुरकर उपस्थित होते. डॉ. सतीश तराळ म्हणाले, चारित्र्य, आत्मशुद्धी खूप महत्वाची आहे. लोकांना तत्वज्ञान सांगणे, प्रबोधन करणे सोपे आहे, परंतु त्याप्रमाणे स्वतःचे जीवन जगणे कठीण आहे. आज देशातील परिस्थिती बिघडत चालली असून, अशा बिघडलेल्या परिस्थितीत गाव सुधारण्याचा किंवा निर्माण करण्याचा एकमेव उपाय म्हणजे आत्मशुद्धी होय. ज्या व्यक्तींची आत्मशुद्धी झाली आहे, त्यांचे चारित्र्य शुद्ध आहे, त्याच व्यक्तींच्या मागे लोक जातात आणि त्यांचे ऐकतात. परंतु यासाठी दुसऱ्यांना उपदेश करण्यापूर्वी प्रत्येकाने स्वतःची जीवनचर्या, साधना, आपले जीवन तपासून पाहिले पाहिजे. व्यक्तींत युक्ती, विचारचारित्र्य असणे आवश्यक आहे. नुसते लोकांना व्यसन सोडण्याचा किंवा सुधारण्याचा उपदेश करून चालत नाही.तर त्याप्रमाणे स्वतः कृती करण्याची गरज आहे.

प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे म्हणाले, संतांचे विचार हे प्रत्येक विद्यार्थीपर्यंत पोहोचावे, विद्यापीठाचा विद्यार्थी चारित्र्यसंपन्न घडावा, देशाच्या विकासात त्याचे योगदान राहावे, याकरिता अभ्यासासह संतांचे विचार त्यांच्यापर्यंत पोहोचावे, या उद्देशाने विद्यापीठातर्फे अशाप्रकारच्या व्याख्यानमालांचे आयोजन केले जाते. डॉ. सतीश तराळ यांनी ग्रामगीतेतील लोकवशीकरण पंचकातील आचारप्राबल्य हा विषय सोप्या भाषेत मांडला. संतानी समाजाला विचार दिले नाहीत, तर त्यांनी कृती केली. कृतीतून समाजाला पटेल असे विचार मांडले, विद्यार्थीनी सुद्धा कृती करून आपले जीवन समृद्ध कसे होईल, यावर भर द्यावा, असेही ते म्हणाले.

याप्रसंगी शामराव मोकदम यांच्यावरील पुस्तकाचे प्रकाशन मान्यवरांच्या हस्ते केले. डॉ. सतीश तराळ यांनी महाविद्यालयाला त्यांनी लिहिलेली पुस्तके भेट दिली. स्वागतपर भाषण प्राचार्य डॉ. हेमंत देशमुख, कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. विनोद खडसे यांनी केले, तर आभार ग्रंथपाल प्रा. रवींद्र पाटील यांनी मानले. व्याख्यानाला प्राध्यापक, राष्ट्रसंतांचे भाविक, मोकदम कुटुंबातील सदस्य, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी उपस्थित होते.

## आंतरराष्ट्रीय परिषदेत राष्ट्रसंतांनी मांडले विचार

मोकदम यांनी राष्ट्रसंतांच्या मार्गदर्शनात आरती मंडळ स्थापन करण्याचे महत्वाचे कार्य कृतीतून केले. स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी, लोकांमध्ये राष्ट्रभक्तीची व बलिदानाची भावना जागृत करण्यासाठी गावोगावी जावून प्रचार केला. राष्ट्रसंतांचे जीवन प्रत्यक्ष कृती, आचार 'प्राबल्यावर आधारित होते. त्यांनी कृतीतून समाजप्रबोधन केले. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हे महाराष्ट्र आणि देशापूरतेच मर्यादीत नसून, ते जगातील एक महान राष्ट्रसंत आहेत. स्वामी विवेकानंदांनी शिकागो धर्मपरिषदेत विचार मांडले. तर राष्ट्रसंतांनी सुद्धा जपान येथील आंतरराष्ट्रीय परिषदेत विचार मांडले. राष्ट्रसंतांनी ग्रामगीतेतून गावाच्या विकासासाठी विचार मांडले नाही, तर गाव हा विकासाचा नकाशा मानून जगाचे स्वरूप बदलण्याची क्षमता त्यांच्या विचारात दिसून येते. त्यांची देव, धर्माची संकल्पना मानवतावादी होती. राष्ट्रसंतांचे जीवन हे कर्मयज्ञ, कृतीयज्ञ, आचारधर्माचे मूर्तीमंत रुप होते, असेही त्यांनी सांगितले. या वेळी मधु घारड व हरिभाऊ वेरुळकर यांनीही मनोगत व्यक्त केले.

हिंदुस्थान

# एन.सी.सी. महाराष्ट्र संचालनालयाच्या अतिरिक्त महासंचालकांची विद्यापीठाला सदिच्छा भेट; कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचेशी विविध मुद्यांवर चर्चा



अमरावती दि. २५ : राष्ट्रीय छात्रसेना (एन.सी.सी.) महाराष्ट्र संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी मंगळवारी २५ ऑगस्ट रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला सदिच्छा भेट दिली. कुलगुरू कार्यालयात झालेल्या या भेटीदरम्यान मेजर जनरल त्यागी यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचेशी विविध मुद्यांवर सांगोपांग चर्चा केली. अमरावती विभागातील पाचही जिल्ह्यांमधील महाविद्यालयीन युवकांपर्यंत एनसीसीचा विस्तार वाढवून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यावर विशेष भर देण्यात आला.

युवकांना ड्रोन तंत्रज्ञान, ड्रोन पायलट प्रशिक्षण, सायबर सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, एनसीसीमधील विद्यार्थीनी तसेच महिला कॅडेट्सचा सहभाग वाढवून त्यांच्यात नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसीत करणे, प्रधानमंत्री व केंद्र शासनाच्या विविध इंटर्नशिप योजनांशी कॅडेट्सना जोडून त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, मेळघाटासारख्या वैशिष्टएपूर्ण भौगोलिक परिसराचा व कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचा विचार करून ग्रामीण व आदिवासी भागातील युवकांपर्यंत एनसीसीचे जाळे विस्तारणे अशा विविध मुद्यांवर चर्चेदरम्यान भर देण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठातर्फे एनसीसीच्या प्रत्येक उपक्रम व विस्ताराला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. तसेच शैक्षणिक संस्थांच्या सहकार्याने ज्ञान, प्रयोगशाळा आणि तज्ज्ञांचे मार्गदर्शन एनसीसी कॅडेट्सपर्यंत पोहोचवण्याचा मानस कुलगुरूंनी व्यक्त केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. मेहंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, एनसीसी चे मेजर संदीप गवळी आदी उपस्थित होते.

# रोजगार मेळाव्यात ३४७ उमेदवारांची प्राथमिक निवड

## ७२१ उमेदवारांची नोंदणी; ५६२ जणांनी दिल्या प्रत्यक्ष मुलाखती

**नमस्कार अमरावती**

**अमरावती (प्रतिनिधी) दि. २१ :** स्वामी विवेकानंद विद्यार्थी भवन, अमरावती विद्यापीठ परिसर येथे १८ ऑगस्ट रोजी आयोजित पं. दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्यात विविध कंपन्या व बँकांनी घेतलेल्या प्रत्यक्ष मुलाखतीत ३४७ उमेदवारांची विविध पदांसाठी प्राथमिक निवड करण्यात आली.



संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभाग, कौशल्य विकास विभागीय आयुक्तालय, अमरावती आणि जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने या रोजगार मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. मेळाव्यासाठी ऑनलाइन व ऑफलाइन माध्यमातून एकूण ७२१ उमेदवारांनी नोंदणी केली होती. त्यापैकी ५६२ उमेदवारांनी प्रत्यक्ष उपस्थित राहून विविध कंपन्या व बँकांच्या प्रतिनिधींसमोर मुलाखती दिल्या.

आदित्य अनघा मल्टीस्टेट क्रेडिट को-ऑपरेटिव्ह सोसायटी लि., अभिनंदन को-ऑपरेटिव्ह बँक लि., जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँक लि., महिंद्रा अँड महिंद्रा फायनान्स प्रा. लि., क्रेडिटअॅक्सेस ग्रामीण लि. आणि श्रीराम फायनान्स लि. या सहा कंपन्या व बँकांचे प्रतिनिधी मेळाव्यात सहभागी झाले होते. त्यांनी उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेऊन विविध पदांसाठी ३४७ उमेदवारांची प्राथमिक निवड केली.

विभागीय रोजगार मेळावा समन्वय समितीचे अध्यक्ष किरण पातुरकर यांच्या हस्ते मेळाव्याचे उद्घाटन झाले. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाचे प्र. कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. कृषी विभागाचे सहसंचालक गणेश घोरपडे, जिल्हास्तरीय रोजगार मेळावा समन्वय समितीचे अध्यक्ष भूषण काळमेघ आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन बाळासाहेब मोगले यांनी केले. जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्राच्या सहाय्यक आयुक्त प्रांजली बारस्कर यांनी आभार मानले.

# विद्यापीठात स्वातंत्र्यदिनी 'अमृत-एसआरआयएफ' योजनेचा शुभारंभ

**पुण्य नगरी / प्रतिनिधी**

**अमरावती :** संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठात स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून रिसर्च ॲण्ड इन्क्युबेशन फाउंडेशन आणि अमृत यांच्या संयुक्त विद्यमाने राबविण्यात येणाऱ्या 'अमृत-एसआरआयएफ' योजनेचा शुभारंभ करण्यात आला.

या योजनेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते व अमृतचे व्यवस्थापकीय संचालक विजय जोशी यांच्या हस्ते करण्यात आले. विद्यापीठातील विद्यार्थी, नवउद्योजक आणि स्टार्टअप्सना उद्योग व व्यवसाय क्षेत्रासाठी आवश्यक मार्गदर्शन, इन्क्युबेशन सुविधा, तज्ज्ञांचे मार्गदर्शन आणि उद्योजकता विकासासाठी आवश्यक साहाय्य उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने ही योजना महत्त्वपूर्ण ठरणार आहे. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, इन्क्युबेशन सेंटरच्या प्रमुख डॉ. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरुळकर यांच्यासह विद्यापीठातील विविध



विभागांचे संचालक, अधिकारी व मान्यवर तसेच अमृतचे अमरावती विभागीय व्यवस्थापक प्रवीण कोळेश्वर, जिल्हा व्यवस्थापक ऋषिकेश कथलकर प्रामुख्याने उपस्थित होते. 'अमृत-एसआरआयएफ' योजनेच्या माध्यमातून पात्र विद्यार्थी व नवउद्योजकांना त्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना व्यावसायिक स्वरुप देण्यासाठी आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध होणार आहे. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इन्क्युबेशन सेंटरच्या टीममधील नरेश मोवाळे, रवी ढेंगळे, रणधीर घाटे, आदित्य किल्लेवाले आदींनी परिश्रम घेतले.

दैनिक भास्कर

# एनसीसी का अमरावती संभाग में होगा विस्तार!

▪ ड्रोन से साइबर सुरक्षा तक प्रशिक्षण, मेलघाट के युवाओं को जोड़ने पर जोर



भास्कर डेस्क| अमरावती.

एनसीसी का अमरावती संभाग में तेजी से विस्तार करने पर मंगलवार को मंथन किया गया। एनसीसी महाराष्ट्र संचालनालय के अतिरिक्त महानिदेशक मेजर जनरल विवेक त्यागी के संत गाडगेबाबा अमरावती विश्वविद्यालय दौरे में एनसीसी को संभाग के पांचों जिलों के युवाओं तक पहुंचाने की रणनीति पर मंथन हुआ। कुलपति डॉ. मिलिंद बारहाते के साथ हुई बैठक में एनसीसी को केवल परेड और अनुशासन तक सीमित न रखते हुए युवाओं को आधुनिक तकनीक व रोजगारोन्मुख प्रशिक्षण से जोड़ने पर जोर दिया गया। बैठक में युवाओं को ड्रोन तकनीक, ड्रोन पायलटिंग, साइबर सुरक्षा, आपदा प्रबंधन और आधुनिक कृषि तकनीक का प्रशिक्षण देने की योजना पर चर्चा हुई। छात्राओं और महिला कैडेट्स की भागीदारी बढ़ा कर उनमें नेतृत्व क्षमता व आत्मविश्वास विकसित करने तथा केंद्र सरकार की इंटर्नशिप योजनाओं से जोड़कर रोजगार और स्वरोजगार के अवसर उपलब्ध कराने पर भी जोर दिया गया। मेलघाट जैसे दुर्गम एवं आदिवासी क्षेत्रों के युवाओं तक एनसीसी का नेटवर्क पहुंचाने को भी प्राथमिकता देने की बात सामने आई। इसके जरिए ग्रामीण युवाओं को तकनीकी प्रशिक्षण और राष्ट्रसेवा से जोड़ने का प्रयास करने पर दोनों ही प्रमुख अधिकारियों ने मंथन किया। कुलपति डॉ. मिलिंद बारहाते ने एनसीसी के विस्तार के लिए विश्वविद्यालय की ओर से पूर्ण सहयोग का भरोसा दिलाया।

उन्होंने शैक्षणिक संस्थानों की प्रयोगशालाओं, विशेषज्ञों और ज्ञान-संसाधनों का लाभ एनसीसी कैडेट्स तक पहुंचाने की भी बात कही। बैठक में प्र-कुलपति डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे और एनसीसी मेजर संदीप गवली सहित अधिकारी उपस्थित थे।

मराठी दैनिक वृत्त केसरी

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त विद्यापीठात विविध क्रीडा स्पर्धा

## विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाचे आयोजन





प्रतिनिधी / वृत्त केसरी

अमरावती, ३० ऑगस्ट : राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या शारीरिक शिक्षण विभागाच्यावतीने याहीवर्षी विद्यापीठातील शैक्षणिक विभागाच्या विद्यार्थ्यांसाठी व्हॉलीबॉल, रस्साखेच, लंगडी अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. राष्ट्रीय क्रीडा दिवसाचे उद्घाटन भौतिकशास्त्र विभाग प्रमुख डॉ.संदीप वाघुळे, सूक्ष्मजीवशास्त्र विभागाचे डॉ. एन. व्ही. फिरके यांच्या उपस्थितीत पार पडले.याप्रसंगी डॉ.संदीप वाघुळे मार्गदर्शन करतांना म्हणाले, क्रीडा दिवस हा विद्यार्थ्यांमधील खेळाची आवड आणि सुप्त गुणांना वाव मिळावा, यासाठी साजरा केला जातो. या दिवशी विविध मैदानी आणि सांघिक खेळांच्या स्पर्धा आयोजित केल्या जातात. डॉ. एन. व्ही. फिरके म्हणाले, आजच्या मोबाईल आणि संगणकाच्या युगात आपण मैदानी खेळांकडे दुर्लक्ष करीत आहोत. त्यामुळे प्रत्येक विद्यार्थ्याने दररोज व्यायाम आणि खेळासाठी वेळ दिला पाहिजे. व्हॉलीबॉल स्पर्धेत एम. बी. ए., शारीरिक शिक्षण, हॉस्टल टीम, भौतिक शास्त्र, जीवतंत्रज्ञान, रासायनिक तंत्रज्ञान विभागातील विद्यार्थ्यांच्या संघाने भाग घेतला. मुलींच्या लंगडी स्पर्धेत शारीरिक शिक्षण विभाग, मुलांच्या व्हॉलीबॉल स्पर्धेत शारीरिक शिक्षण टीम विजयी, तर एम. बी. ए. विभाग उपविजयी ठरला. विजेत्या संघाला मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देवून गौरविण्यात आले. बक्षीस वितरण समारंभाला रासायनिक तंत्रशास्त्र विभागाचे डॉ. प्रशांत शिगवेकर उपस्थित होते. शारीरिक शिक्षण विभाग प्रमुख डॉ. तनुजा राऊत यांनी माहिती देतांना खेळ आपल्याला जिकण्याइतकेच हरण्याचे महत्त्वही शिकवतो. पराभवातून आपण आपल्या चुका समजून घेतो आणि पुढील वेळी अधिक चांगली कामगिरी करण्याचा प्रयत्न करतो असे सांगून खेळामुळे जीवनातील अनेक मौल्यवान धडे मिळतात, असे सांगितले. यावेळी डॉ. हेमंतराज कावरे, डॉ. अतुल बिजवे, डॉ. विजय निमकर, डॉ. निलेश इंगोले, डॉ. सौरभ त्रिपाठी, सविता बावनथडे उपस्थित होते. संचालन रोजा गुरुंग व प्रज्वल ढोके यांनी, पाहुण्यांचा परिचय व आभार निखिल डोंगरे याने मानले.

विदर्भ मतदार

# एन.सी.सी.च्या अतिरिक्त महासंचालकांची विद्यापीठाला भेट

## कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्याशी विविध मुद्यांवर चर्चा



अमरावती (प्रतिनिधी) दि. २५ : राष्ट्रीय छात्रसेना (एन.सी.सी.) महाराष्ट्र संचालनालयाचे अतिरिक्त महासंचालक मेजर जनरल विवेक त्यागी यांनी मंगळवारी २५ ऑगस्ट रोजी संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाला सदिच्छा भेट दिली. कुलगुरू कार्यालयात झालेल्या या भेटीदरम्यान मेजर जनरल त्यागी यांनी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांचेशी विविध मुद्यांवर सांगोपांग चर्चा केली. अमरावती विभागातील पाचही जिल्हांमधील महाविद्यालयीन युवकांपर्यंत एनसीसीचा विस्तार वाढवून विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यावर विशेष भर देण्यात आला.

युवकांना ड्रोन तंत्रज्ञान, ड्रोन पायलट प्रशिक्षण, सायबर सुरक्षा, आपत्ती व्यवस्थापन, आधुनिक कृषी तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देणे, एनसीसीमधील विद्यार्थीनी तसेच महिला कॅडेट्सचा सहभाग वाढवून त्यांच्यात नेतृत्वगुण आणि आत्मविश्वास विकसीत करणे, प्रधानमंत्री व केंद्र शासनाच्या विविध इंटर्नशिप योजनांशी कॅडेट्सना जोडून त्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देणे, मेळघाटासारख्या वैशिष्टपूर्ण भौगोलिक परिसराचा व कृषीप्रधान अर्थव्यवस्थेचा विचार करून ग्रामीण व आदिवासी भागातील युवकांपर्यंत एनसीसीचे जाळे विस्तारणे अशा विविध मुद्यांवर चर्चेदरम्यान भर देण्यात आला. यावेळी कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी विद्यापीठातर्फे एनसीसीच्या प्रत्येक उपक्रम व विस्ताराला संपूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. मेहंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे, मेजर संदीप गवळी उपस्थित होते.

**The Hitavada**

# 'Tukdoji Maharaj first experienced social evils before guiding society'

■ Amravati Bureau
AMRAVATI, Aug 29

RASHTRASANT Tukdoji Maharaj did not merely preach social reform through his *Gramgeeta*, but first experienced social evils such as addiction, superstition, ignorance, and poverty before offering guidance to society, said Dr Satish Taral, noted Amravati based writer and speaker.

He was speaking on 'Achaar Prabalya in Lokvashikaran Panchak of Gramgeeta' at the Shyamraodada Mokadam Memorial Gramgeeta lecture series organised at Teosa. The programme was jointly organised by the Public Relations Department of Sant Gadge Baba Amravati University and YDVD Arts and Commerce College, Teosa, from the donation received from the Pracharbhishma Shyamraodada Mokadam Birth Centenary Central Committee, Amravati.



Dr Satish Taral delivering lecture.

Dr Satish Taral said the teachings of Rashtrasant Tukdoji Maharaj would bear fruit only when people translated them into action. Merely preaching to others about giving up addictions or improving society is not enough, individuals must first practise what they preach, he said. 'Character and self-purification are extremely important. It is easy to preach philosophy and social reform, but very difficult to live by those principles,' Dr Taral said. Self-purification is the key to improving villages and society, particularly amid the deteriorating social conditions, he added.

He said individuals who had purified themselves and maintained strong character naturally earned the trust and respect of people. Before advising others, everyone must introspect about their own lifestyle, discipline and conduct, he said.

Dr Taral cited the examples of Sant Gadgebaba, Rashtrasant Tukdoji Maharaj, Govind Prabhu, Mahatma Gandhi, Shyamraodada Mokadam, Mahatma Jyotirao Phule and Dr Narendra Dabholkar, saying they first translated their ideals into action before working to reform society. He recalled the social work of Sant Gadgebaba, who travelled extensively and spent years understanding the problems faced by people. He also highlighted Mahatma Gandhi's efforts to understand social conditions before leading the freedom movement. Shyamraodada Mokadam, under the guidance of Rashtrasant Tukdoji Maharaj, established Aarti Mandals and travelled from village to village to spread patriotism and inspire people during the freedom movement, Dr Taral said.

Tukdoji Maharaj's teachings were not confined to Maharashtra or India and had universal relevance, he said. Through *Gramgeeta*, Tukdoji Maharaj envisioned not merely village development but transformation of society and the world. His concepts of God and religion were rooted in humanity, while his entire life represented the ideals of action, service and righteous conduct, Dr Taral said.

Madhubhau Gharad and Acharya Haribhau Virulkar also expressed their views. In his presidential address, Dr Mahendra Dhore said the university organises such lecture series with the objective of taking the teachings of saints to students and helping develop their character.

Dr Dhore appreciated Dr Taral for presenting the concept of Achaar Prabalya from *Gramgeeta* in simple language and urged students to translate noble thoughts into action in their own lives.

The programme began with worship and floral tributes to the portraits of Sant Gadge Baba, Chhatrapati Shivaji Maharaj, Dr Panjabrao alias Bhausaheb Deshmukh, Rashtrasant Tukdoji Maharaj, Shyamraodada Mokadam and Yadavrao Deshmukh. A book on Shyamraodada Mokadam was released on the occasion.

Dr Taral also presented copies of books authored by him to the college. Dr Hemant Deshmukh, Principal delivered the welcome address, while Dr Vilas Nandurkar, Public Relations Officer made the introductory remarks. Prof Vinod Khadse conducted the proceedings and librarian Prof Ravindra Patil proposed a vote of thanks. A large number of college teachers, devotees of Rashtrasant Tukdoji Maharaj, members of the Mokadam family, teaching and non-teaching staff and students attended the programme.

The event concluded with the national salute.

**सकाळ**

# शिक्षणातील नवकल्पनला विद्यापीठाचा हातभार

## रिसर्च अँड इनक्युबेशन फाउंडेशन अंतर्गत अर्थसाहाय्य

**अमरावती, ता. ३० :** शिक्षणक्षेत्रातील नवकल्पना, तंत्रज्ञान आणि उद्योजकतेला चालना देण्याच्या दृष्टीने संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठाच्या रिसर्च अँड इनक्युबेशन फाउंडेशनने (एसआरआयएफ) आणखी एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. स्टार्टअप इंडिया सीड फंड स्किम अंतर्गत रिसर्च अँड इनक्युबेशन फाउंडेशनला मंजूर झालेल्या सीड फंडातून मेधा वाटिका एडलॅब्स प्रा. लि. या स्टार्टअपला अर्थसाहाय्य देण्यास मंजुरी देण्यात आली आहे.




**अमरावती :** करारनाम्यावर स्वाक्षरी करताना मान्यवर व विद्यापीठातील पदाधिकारी.

या अर्थसाहाय्याच्या अनुषंगाने रिसर्च अँड इनक्युबेशन फाउंडेशन यांच्यातील करारनाम्यावर स्वाक्षऱ्या करण्यात आल्या. याप्रसंगी इनक्युबेशन सेंटर प्रमुख प्रा. स्वाती शेरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद यादव, व्यवस्थापक अमोल हिरूळकर, मेधा वाटिका एडलॅब्स प्रा. लि. च्या संचालक डॉ. केतकी कलेले व राहुल चुटे उपस्थित होते.

मेधा वाटिका एडलॅब्स प्रा. लि. ही शिक्षणक्षेत्रात डिजिटल तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारी नावीन्यपूर्ण एडटेक स्टार्टअप असून, विद्यार्थ्यांसाठी डिजिटल सायन्स, मॅथेमेटिक्स आणि लँग्वेज लॅब विकसित करण्याचे कार्य करते. जेमिफिकेशन, स्टोरीटेलिंग, सिम्युलेशन्स आणि हँडस् ऑन लर्निंग, यासारख्या आधुनिक पद्धतींच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना अधिक मनोरंजक, संवादात्मक आणि अनुभवाधारित शिक्षण देण्यावर कंपनीचा भर आहे. स्टार्टअप इंडिया सीड फंड स्किम अंतर्गत प्राप्त निधीतून मेधा वाटिका एडलॅब्स प्रा. लि. ला उपलब्ध करून देण्यात येणाऱ्या अर्थसाहाय्यामुळे कंपनीच्या तंत्रज्ञान विकास, एडटेक उत्पादनांचा विस्तार तसेच नावीन्यपूर्ण शैक्षणिक उपक्रमांच्या प्रभावी अंमलबजावणीला महत्त्वपूर्ण चालना मिळणार आहे. विशेषतः विद्यार्थ्यांसाठी तंत्रज्ञानाधारित व अनुभवात्मक शिक्षण अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्यास या निधीचा उपयोग होणार आहे.



# संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

# विद्यावार्ता ई - मासिक

## मार्गदर्शक



**श्री जिष्णू देव वर्मा**

मा. राज्यपाल तथा कुलपती

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. मिलींद बारहाते**

मा. कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ



**डॉ. महेंद्र ढोरे**

मा. प्र-कुलगुरू

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## प्रकाशक



**डॉ. अविनाश असनारे**

कुलसचिव

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ

## संपादक



**डॉ. विलास नांदुरकर**

जनसंपर्क अधिकारी

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ